# ‘जागतिक तणावाच्या काळात बुद्धांचे विचार महत्त्वाचे’



**नवी दिल्ली :** बुद्धांचा संदेश केवळ भूतकाळ नाही, तो आजही प्रासंगिक आहे आणि भविष्यासाठीही आवश्यक आहे. बुद्ध पौर्णिमेची ही संधी आपल्याला प्रेरणा देते. आपण आपल्या जीवनात शांतता वाढवूया, करुणेचा अंगिकार करूया आणि संतुलनासह पुढे जाऊया. आज जग ज्या प्रकारच्या तणावातून आणि संघर्षातून जात आहे, अशा काळात बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. त्यांनी ‘मन की बात’ (१३३ वा भाग) कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले की, काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार आहोत. मी तुम्हा सर्व देशवासियांना आधीपासूनच शुभेच्छा देतो. भगवान गौतम बुद्धांचा जीवन संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच सुरू होते, स्वतःवर विजय मिळवणे हाच सर्वात मोठा विजय असतो, हे त्यांनी सांगितले आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २७८
www.ramprahar.com

◆ सोमवार, २७ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे/२

मोरबे धरणात ४३ टक्के जलसाठा/६

कामोठे येथे विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे/८


# महाराष्ट्रात उष्णतेची लाट

## उष्माघातामुळे तीन जणांचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या उन्हाळ्याचा तडाखा प्रचंड वाढला असून अनेक भागात तापमान धोकादायक पातळीवर पोहचले आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंशांच्या पुढे गेले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून आतापर्यंत तीन जणांचा उष्माघाताचे मृत्यू झाला आहे. हवामान खात्यानेही उष्णतेबाबत इशारा दिला आहे.

या वाढत्या उष्णतेचा फटका मानवी आरोग्यावर होताना दिसत आहे. परभणी येथे नाशिकहून आपल्या नातेवाईकांकडे आलेल्या ३७ वर्षीय व्यक्तीचा प्रखर उन्हामुळे जीव गेला. तर लातूर जिल्ह्यात एका बाळाचा व एका वृद्ध व्यक्तीचा या उष्णतेमुळे मृत्यू झाला आहे.

विदर्भात परिस्थिती अधिक गंभीर असून काही शहरांमध्ये तापमान ४५ अंशांच्या आसपास पोहोचले आहे. अकोला, अमरावती आणि नागपूरसारख्या भागांत उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. अनेक ठिकाणी शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय



घेण्यात आला आहे. पुढील काही दिवस हीच परिस्थिती कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नाशिक आणि परिसरातही तापमानात मोठी वाढ झाली आहे. लासलगाव आणि मालेगावमध्ये पारा ४२ ते ४३ अंशांपर्यंत गेला आहे. या उष्णतेचा फटका शेती व पोल्ट्री व्यवसायालाही बसत आहे. कोंबड्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊन उत्पादन घटत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. जळगाव, नंदुरबार आणि लातूरमध्येही उष्णतेची तीव्रता जाणवत आहे. काही ठिकाणी उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय दुपारी बाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. बाहेर जाताना डोकं झाकणे, पाणी सोबत ठेवणे आणि उन्हापासून बचाव करणे गरजेचे आहे.

### मुंबई, पुणे, ठाण्यातही तापमानाचा पारा चढला!

दरम्यान, मुंबई आणि ठाण्यात देखील तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. मुंबई आणि ठाण्यात ३९ अंस सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मुंबईला आज उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. शहराच्या पूर्व उपनगरांमध्ये तापमान ३९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे तर शेजारील ठाण्यातही ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे, मात्र पुढील आठवड्यात तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. पुण्यातही पारा ४० अंशांच्या पुढे गेला आहे.

# लोणेरे हत्याकांडातील आरोपीला अखेर अटक

## ३० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

**अलिबाग, माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील लोणेरे येथे २१ एप्रिल २०२६ रोजी घडलेल्या २२ वर्षीय तरुणीच्या निर्घृण हत्याकांडातील आरोपी संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या प्रकरणातील आरोपी अनिस मोहम्मद खान मालदार (वय ३८, रा. लांजा जि. रत्नागिरी) याला पोलिसांनी ठाणे येथून शनिवारी (दि. २५) अटक केली. त्याला रविवारी (दि.२६) अलिबाग जिल्हा न्यायालय हजर करण्यात आले असता त्याला ३० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

अलिबाग येथे रविवारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत महाड उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांनी ही माहिती दिली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यावेळी उपस्थित होते.

२२ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार करून तिची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली होती. आरोपीने तरुणीचा मृतदेह विवस्त्र अवस्थेत लॉजमधील खोलीत फेकून दिला होता. तसेच तिचे हात-पाय बांधून रक्ताच्या थारोळ्यात टाकल्यामुळे या घटनेने संपूर्ण रायगड जिल्ह्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीचा शोध घेण्यासाठी चार विशेष पथके तयार करण्यात आली होती. रायगडसह रत्नागिरी, ठाणे, नवी मुंबई आणि मुंबई या भागांत शोधमोहीम राबवण्यात आली, मात्र सहा दिवस आरोपीचा ठावठिकाणा लागत नव्हता.

तपासादरम्यान आरोपीवर यापूर्वीही खुनाचा गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या हालचालींचा तपास सुरू ठेवला. तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या आधारे आरोपी गेल्या चार दिवसांपासून ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील एका लॉजमध्ये वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत लॉजमध्ये धाड टाकली आणि डॉरमेटरी रूममधून आरोपीला अटक केली.

पुढील तपास महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे करत असून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील आणि भास्कर जाधव यांच्या पथकाने या कारवाईत भूमिका बजावली.



### सराईतावर याआधीही गंभीर गुन्हे दाखल

आरोपी अनिस मोहम्मद खान मालदार (वय ३८)च्या विरोधात हत्या, लैंगिक अत्याचार आणि अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्टच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील तळवली येथील रहिवाशी आहे. काही वर्षांपूर्वी आरोपी गाव सोडून मुंब्रा येथे राहायला गेला होता. स्वतःच्या मुलीच्या हत्या प्रकरणी काही काळ कारागृहातदेखील होता.

# भोंदू खरातच्या फार्महाऊसमधील कारनाम्यांचाही पर्दाफाश

**मुंबई : प्रतिनिधी**

धर्माच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप असलेला अशोक खरात याच्या अडचणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. आधी ऑफिसबॉयने उघड केलेल्या धक्कादायक माहितीच्या पार्श्वभूमीवर आता त्याच्या फार्महाऊसवर काम करणाऱ्या कुकनेही खरातच्या काळ्या कारनाम्यांचा पर्दाफाश केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका चार्टर्ड अकाउंटंटने (CA) या कुकच्या माध्यमातून खरातच्या हालचालींवर गुप्तपणे लक्ष ठेवले होते. यामुळे फार्महाऊसवर घडणाऱ्या संशयास्पद घटनांची माहिती बाहेर आली. विशेष म्हणजे, या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज विशेष तपास पथकाच्या हाती लागले असून, त्यातून धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

या व्हिडिओमध्ये अशोक खरात महिलांसोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याच्याविरोधातील लैंगिक शोषणाचे आरोप अधिक बळकट झाले आहेत. तपास अधिक खोलात जात असून, या व्हिडिओमधून आणखी गंभीर पुरावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ‘आपली बस, आपली सेवा’

## १ मेपासून राज्यव्यापी अभियान

**मुंबई :** राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारी लालपरी आता नव्या रूपात प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने “आपली बस, आपली सेवा” हे राज्यव्यापी अभियान १ मे २०२६ पासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासी सेवा अधिक शिस्तबद्ध, स्वच्छ आणि विश्वासार्ह करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. बस सेवा सुरू करण्यापूर्वी बसची स्वच्छता, नीटनेटका गणवेश, शिस्तबद्ध आणि नम्र वर्तन यावर भर दिला जाणार आहे. **(सविस्तर पान २ वर)**

## निवडक

### आसाममध्ये भरधाव कारची ट्रकला धडक; तिघींचा मृत्यू

**गुवाहाटी :** आसाममधील गुवाहाटी येथे रविवारी सकाळी एका भीषण रस्ते अपघात घडला असून, या अपघातात तीन तरुणींना आपला जीव गमवावा लागला. या तीनही तरुणी एका कारमधून आपल्या घरी परतत असताना वाटेत त्यांची कार एका ट्रकला धडकली. कारमध्ये प्रवास करणाऱ्या या तिन्ही व्यक्तींचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे.

### वॉशिंग्टनमधील हिल्टन हॉटेलमध्ये गोळीबार

**वॉशिंग्टन :** येथील हिल्टन हॉटेलमध्ये कॉरेस्पॉन्डेंट्स डिनर दरम्यान झालेल्या गोळीबाराच्या घटनेने जग हादरले आहे. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्षा, कॅनडाचे पंतप्रधान यासह अनेक नेत्यांनी आपली प्रतिक्रिया देत या घटनेवर चिंता व्यक्त केली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, वॉशिंग्टन डीसीतील एका हॉटेलमध्ये झालेल्या सुरक्षा घटनेनंतर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, त्यांच्या पत्नी आणि उपराष्ट्राध्यक्ष सुरक्षित असल्याचे समजून दिलासा वाटला असून त्यांना कोणतीही इजा झालेली नाही.

# ममता बॅनर्जी सरकारकडून घुसखोरांना आश्रय -पीएम मोदी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ममता बनर्जी यांच्या सरकारवर जोरदार हल्ला चढवला. बनगाव येथील सभेत बोलताना त्यांनी घुसखोरांना थेट इशारा देत '२९ एप्रिलपूर्वी बंगाल सोडा, अन्यथा ४ मेनंतर कारवाई होईल' असा स्पष्ट इशारा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या सभेनंतर भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी ममता बॅनर्जी सरकारवर घुसखोरांना आश्रय दिल्याचा आरोप केला. भाजप सत्तेत आल्यानंतर प्रत्येक घुसखोराला बाहेरचा रस्ता दाखवला जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. मतुआ-नामशूद्र आणि इतर शरणार्थी कुटुंबांना नागरिकत्व, पत्ता आणि सर्व हक्क देण्याची हमी मोदी यांनी दिली. ही मोदींची गॅरंटी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



मोदी यांनी महिलांसाठी मोठी घोषणा करत सांगितले की, भाजप सरकार आल्यास दरवर्षी ३६,००० रुपये महिलांच्या खात्यात जमा केले जातील. तसेच अंगणवाडी आणि महिला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वेतनातही सुधारणा केली जाईल.

भाजपने बंगालमध्ये मुलींना सरकारी नोकऱ्यांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे महिलांना दुहेरी लाभ मिळेल, असे मोदी यांनी सांगितले. मोदी यांनी आपल्या भाषणात ममता बनर्जी सरकारवर तीव्र टीका करत बंगालमध्ये बदलाची गरज असल्याचे सांगितले. आगामी निवडणुकांमध्ये जनतेने भाजपला संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# तेलंगणात ४७ माओवाद्यांचे आत्मसमर्पण

## मोठा शस्त्रसाठाही पोलिसांकडे सुपूर्द

**तेलंगणा : वृत्तसंस्था**

तेलंगणामध्ये नक्षलविरोधी कारवाईला मोठे यश मिळाले असून २५ एप्रिल २०२६ रोजी तब्बल ४७ माओवाद्यांनी सामूहिक आत्मसमर्पण केले. या सर्वांनी ३२ शस्त्रांसह तेलंगणाचे पोलीस महासंचालक बी. रेड्डी यांच्यासमोर शरणागती पत्करली. या घटनेमुळे दक्षिण बस्तर परिसरातील माओवादी चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये छत्तीसगडमधील दक्षिण बस्तर विभागातील महत्त्वाचे आणि सक्रिय माओवादी कार्यकर्ते असल्याची माहिती पोलिसांनी दिली. विशेष म्हणजे, दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी (DKSZC) सदस्य हेमला इत्थु उर्फ विज्जा आणि प्लाटून कमांडर पोडियम लच्छू उर्फ मनोज यांसारखे वरिष्ठ नेतेही यात



सहभागी आहेत.

या ४७ माओवाद्यांवर एकूण सुमारे १.५ ते २ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर होते. राज्य सरकारने त्यांच्यासाठी आकर्षक पुनर्वसन योजना लागू केली असून, एकूण १.२० कोटी रुपयांचे पॅकेज देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक माओवाद्याला तातडीने २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

शरण आलेल्या माओवाद्यांनी पोलिसांकडे मोठा शस्त्रसाठा जमा केला आहे. यात १ एलएमजी, ४ एके-४७ रायफल्स, ३ एसएलआर, इन्सास रायफल्स, पिस्तूल आणि एकूण ५१५ काडतुसे यांचा समावेश आहे.हे सर्व माओवादी मूळचे छत्तीसगड राज्यातील असून, तेलंगणा सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होऊन त्यांनी शस्त्रे खाली ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते.

या मोठ्या आत्मसमर्पणामुळे दक्षिण बस्तर भागातील माओवादी संघटना कमकुवत झाली असून, स्थानिक सुरक्षेच्या दृष्टीने ही मोठी सकारात्मक घडामोड असल्याचा दावा पोलिस प्रशासनाने केला आहे.

# धीरेंद्र शास्त्रींनी मागितली माफी

**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या एका वक्तव्यावरून वाद निर्माण झाल्यानंतर आता बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांचा माफीनामा समोर आला आहे. आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला, ज्यांच्यापासून हिंदू राष्ट्राची प्रेरणा घेतली त्यांचा अवमान करण्याचा विचार मनामध्येही येणार नाही असं धीरेंद्र शास्त्री म्हणाले. आपल्या वक्तव्यामुळे जर कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर त्याबद्दल मनापासून माफी मागतो असंही ते म्हणाले.

नागपूरमधील एका कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदासांसंबंधी एक वक्तव्य केलं होतं. त्यानंतर राज्यभरातून त्यांच्यावर टीकेची झोड उडाल्याचं दिसलं. धीरेंद्र शास्त्री यांनी आता त्यांच्या वक्तव्यावरुन स्पष्टीकरण देत माफीनामा सादर केला.

# पीएफ धारकांसाठी गुड न्यूज!

## युपीआयद्वारे काही मिनिटांत काढता येणार पैसे; ईपीएफओचे नवे नियम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नोकरी करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. Employees' Provident Fund Organisation (EPFO) ने पीएफ (Provident Fund) काढण्याच्या प्रक्रियेत मोठा बदल करत ती अधिक जलद आणि सोपी करण्याचा निर्णय घेतला आहे. आता PF धारकांना त्यांच्या खात्यातील पैसे काढण्यासाठी दिवसन्‌दिवस वाट पाहण्याची गरज राहणार नाही. नवीन नियमानुसार, UPI द्वारे काही मिनिटांतच पैसे काढणे शक्य होणार आहे.

सध्या PF पैसे काढण्यासाठी अर्ज केल्यानंतर २ ते ५ दिवसांचा कालावधी लागतो. मात्र, नव्या



सुविधेमुळे ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आणि त्वरित होणार आहे. Employees' Provident Fund Organisation कडून UPI आधारित विथड्रॉल सिस्टम सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे PF खातेधारकांना थेट त्यांच्या बँक खात्यात पैसे मिळणार आहेत.

या नव्या सुविधेसाठी खातेदारांचा UAN (Universal Account Number) सक्रिय असणे आणि त्याला आधार व बँक खात्याशी लिंक असणे आवश्यक आहे. तसेच, KYC प्रक्रिया पूर्ण असणेही अनिवार्य राहणार आहे. या सर्व अटी पूर्ण असल्यास, अर्ज केल्यानंतर काही मिनिटांतच PF रक्कम खात्यात जमा होईल. विशेष म्हणजे, ही सुविधा आपत्कालीन गरजांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. वैद्यकीय खर्च, घरगुती गरजा किंवा इतर तातडीच्या कारणांसाठी कर्मचारी आता सहजपणे PF मधील पैसे वापरू शकतील. यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचणार असून, प्रक्रिया अधिक पारदर्शक होणार आहे.

आगामी काळात ही प्रणाली अधिक व्यापक पातळीवर लागू होणार असून, देशभरातील कोट्यवधी PF धारकांना याचा थेट फायदा होणार आहे.

# गोबर गॅस टाकीत गुदमरून तिघांचा मृत्यू

**जेजुरी : प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील बेलसर नजीक चोपण वस्ती परिसरातील एका मशरूम कंपनीत रविवारी (दि.२६) हृदयद्रावक घटना घडली. गोबर गॅस टाकीची साफसफाई करताना विषारी वायूचा फटका बसून तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, कंपनी परिसरातील सुमारे ५ बाय ५ फूट आकाराच्या गोबर गॅस टाकीची साफसफाई सुरू होती. यावेळी एक कामगार टाकीत उतरला. मात्र टाकीमध्ये साचलेल्या विषारी वायूमुळे काही क्षणांतच त्याचा श्वास गुदमरू लागला. त्याला वाचवण्यासाठी दुसरा कामगार तत्काळ टाकीत उतरला, पण दुर्दैवाने त्याचाही श्वास गुदमरला.

दोघांना बाहेर काढण्यासाठी ठेकेदार स्वतः टाकीत उतरला, मात्र टाकीतील घातक वायूचा फटका त्यालाही बसला आणि काही क्षणांतच तिघेही बेशुद्ध पडले. मदतीसाठी धावलेल्या इतर कामगारांनी त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता. तिघांचाही जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

# ‘मिसिंग लिंक प्रकल्पामुळे अर्थव्यवस्थेला मिळणार गती’



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः ‘ॲक्सेस कंट्रोल’ बनवणाऱ्या महत्त्वाच्या ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. “मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत,” असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

दरम्यान, या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे.

# ‘आपली बस, आपली सेवा’ १ मेपासून एसटीचे नवे अभियान -परिवहनमंत्री सरनाईक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीनं आणि नव्या संवेदनशीलतेनं प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने “आपली बस आपली सेवा” या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे.

या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सविस्तर परिपत्रक जारी केले आहे.



मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता ‘सेवक’ बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे.

बस सुटण्यापूर्वी चालकाने स्वतःची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणेहा केवळ औपचारिक भाग नसून, प्रवाशांशी नातं जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासादरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल.

या अभियानात प्रवाशांनाही समान सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वतः घेणे, तसेच मोठे सामान योग्य ठिकाणी ठेवणेया साध्या सवयी प्रवास अधिक सुखकर बनवतील. तसेच एनसीएमसी स्मार्ट कार्डचा वापर आणि ऑनलाइन आरक्षणाचा स्वीकार ही आधुनिकतेकडे टाकलेली पावले ठरतील.

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण होणे या अनपेक्षित परिस्थितींमध्ये प्रवाशांना तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके आणि परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. प्रवाशांच्या तक्रारींना केवळ नोंद न मानता, त्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. प्रत्येक स्तरावर नियमित आढावा घेत, सेवेतील उणिवा दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

१ मे २०२६ पासून राज्यभर राबविण्यात येणारे हे अभियान केवळ सेवा सुधारण्याचा उपक्रम नसून, एसटी आणि प्रवासी यांच्यातील विश्वासाचा नवा सेतू ठरणार आहे. लालपरीच्या चाकांना आता केवळ वेग नाही, तर संवेदनशीलतेचीही दिशा मिळणार आहे.

“आपली बस, आपली सेवा” हा मंत्र प्रत्यक्षात उतरला, तर प्रत्येक प्रवास हा केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा मार्ग न राहताएक सुखद, सन्मानपूर्वक आणि समाधानकारक अनुभव ठरेल. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# खेळ आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे

**मुंबई : प्रतिनिधी**

लिंग भेद दूर करण्याबाबत राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई (UNGEI) यांच्या सहकार्याने देशात पहिल्यांदा धाराशीव जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला.



संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला असून त्यामध्ये १२० शाळा, ८००हून अधिक शिक्षक आणि १८,००० हून अधिक मुलांचा सहभाग होता. धाराशिवमध्ये प्रायोगिकतत्वावर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फे लिंग समभाव हा विषय खेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.

“मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असंच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज आहे, कारण आम्ही दोघेही समान कामं करतो,” आर्णी गावातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या प्रज्ञा पाटोळे हिने स्वअनुभव कथन केला. शासन आणि युनिसेफ, अंगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उपक्रमामुळे मुलींना लिंग समभावाचे शिक्षण मिळाले.

# पर्यटकांची सुरक्षितता जपण्यासाठी श्रीवर्धनमध्ये कडक पावले

## ■ व्यावसायिकांचा कायदेशीर व जबाबदार पुढाकार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथे घडलेल्या संशयास्पद घटनेच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन येथील पर्यटन व्यावसायिकांनी आता अधिक सजग आणि जबाबदार भूमिका घेतली आहे. पर्यटन क्षेत्राची विश्वासार्हता व सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी व्यावसायिकांनी कायद्याच्या चौकटीत राहून काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुरू केल्या आहेत.

श्रीवर्धन हे कोकणातील एक प्रमुख पर्यटनस्थळ असून येथे पारंपरिकरीत्या कुटुंबीय, धार्मिक पर्यटक तसेच शालेय सहलींचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. मात्र, गेल्या काही महिन्यांत पर्यटकांच्या स्वरूपात बदल जाणवू लागला आहे. विशेषतः तरुण वर्गाचे गट वाढले असून काही वेळा स्थानिक शांततेवर परिणाम होणाऱ्या घटनाही निदर्शनास आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पर्यटन व्यावसायिकांना काही नवीन आणि संवेदनशील परिस्थितींना सामोरे जावे लागत आहे. दुचाकीवर येऊन तातडीने खोलीची मागणी करणारे अल्पवयीन मुलगा-मुलगी, तसेच स्वतःला नवविवाहित दांपत्य म्हणून ओळख करून देणारे काही ग्राहक याबाबत अधिक सतर्कता बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे. काही प्रकरणांत वय किंवा ओळख पडताळणी करताना विसंगती आढळल्याने व्यावसायिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

यासंदर्भात, पर्यटन व्यावसायिकांनी उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे प्रत्येक ग्राहकाकडून वैध ओळखपत्र (ID Proof) घेणे,अल्पवयीन व्यक्तींना स्वतंत्रपणे खोली देण्यास नकार विवाहाचा दावा करणाऱ्या जोडप्यांकडून आवश्यक पुरावे मागवणे स्थानिक पोलिस प्रशासनाशी समन्वय वाढवणे

लॉज/हॉटेल नोंदणी रजिस्टर व्यवस्थित ठेवणे

अल्पवयीन व्यक्तींशी संबंधित कोणत्याही संशयास्पद व्यवहारांबाबत तात्काळ माहिती देणे ही व्यावसायिकांची जबाबदारी आहे. तसेच, पर्यटन व्यवसाय चालवताना “अतिथी देवो भव” या संकल्पनेसोबतच सामाजिक जबाबदारी आणि कायदेशीर बंधने पाळणे अत्यावश्यक आहे.

पर्यटन व्यवसायिकांच्या मते, श्रीवर्धनची ओळख ही सुरक्षित, कुटुंबवत्सल आणि शांत पर्यटनस्थळ अशी आहे. ही प्रतिमा अबाधित ठेवण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्रितपणे प्रयत्नशील आहोत. कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना येथे स्थान दिले जाणार नाही.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनीही संशयास्पद हालचाली आढळल्यास प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पर्यटन क्षेत्राचा शाश्वत विकास आणि सामाजिक मूल्यांचे रक्षण या दुहेरी उद्दिष्टांसाठी श्रीवर्धनमध्ये हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# कोपरखैरणेत रंगले खुले कविसंमेलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कोपरखैरणे व घणसोली शाखेच्या संयुक्त विद्यमाने थोर कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून कोपरखैरणे येथील ज्ञान विकास विद्यालयात भव्य 'खुले कवी संमेलन' शनिवारी २५ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्र शासनाचा 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल. जयश्रीताई पी. सी. पाटील यांचा या कार्यक्रमात विशेष नागरी सत्कार करण्यात आला.

प्रारंभी ,मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. महिला सबलीकरण क्षेत्रात गेल्या ४० वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या जयश्रीताई पाटील यांना कोमसापच्या ज्येष्ठ कवयित्री दमयंती भोईर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना हा सन्मान स्वतःचा नसून नवी मुंबईतील सर्व कष्टकरी महिला भगिनींचा असल्याचे सांगत



तो त्यांना अर्पण केला. कोकण मराठी साहित्य परिषदेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष मोहन भोईर यांनी जयश्रीताईंच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

ज्ञानविकास संस्थेचे अध्यक्ष ॲड. पी. सी. पाटील यांनी कोमसापच्या साहित्यिक उपक्रमाचे कौतुक केले व संस्थेचे व्यासपीठ साहित्यिकांसाठी सदैव खुले राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी कोमसापचे कार्यवाह सुनील रानकर , प्रेरणा पाटील, प्रशासकीय अधिकारी रामदास बिडवे, मुख्याध्यापक जगन्नाथ दळवी, राजाराम अहिराव, प्रतिभा पाटील, माणिक दुपटे आणि कोमसापचे श्यामसुंदर गांवकर तसेच रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कविवर्य नारायण सुर्वे यांच्या साहित्यावर प्रकाश टाकण्यात आला. कवयित्री दमयंती भोईर यांनी सुर्वे यांच्या अपरिचित कवितांची ओळख करून दिली. त्यानंतर 'आगरी कवितेचे बादशहा' पुंडलिक म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन रंगले. या संमेलनात जितेंद्र लाड, अक्षता गोसावी, ऋतुजा गवस या निमंत्रित कवींसह लोमहर्ष भगत, लक्ष्मण माने आणि प्रकाश बागडे, मच्छिंद्र पाटील, सुरेश शिंदे, मीनाक्षी तांडेल, राजेंद्र नाईक, ज्योती सपकाळ, सुमित म्हात्रे यांनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. उर्दू शायर इक्बाल कवारे यांनी आपल्या शेरोशायरीने विशेष रंगत भरली.

# नागोठण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नागोठणे येथे बौद्धजन पंचायत समिती नागोठणे विभाग शाखा क्रमांक ३ यांच्या वतीने विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह येथे अत्यंत उत्साही व जल्लोष पूर्ण वातावरणात पार पडला.

भीम जयंती महोत्सवानिमित्त बुद्ध पूजापाठ,पंचशील ध्वजारोहण , बौद्धाचार्य श्रामनेर संघ नागोठणे विभाग) ,सायंकाळी ३ वाजता नागोठणे शहरातून महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक, तर सायंकाळी समाजभूषण एस. एन. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा पार पडली. प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राज्यशास्त्र विभाग विद्यापीठ मुंबई चे प्राध्यापक डॉ मृदुल निळे यांनी सभेला संबोधित केले.स्वागताध्यक्ष चंद्रकांत गायकवाड यांनी व जयंती उत्सव कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वी व उत्कृष्ट नियोजनात जयंती महोत्सव कमिटी चे अध्यक्ष संजय जाधव,



उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य ऍड प्रकाश कांबळे, सचिव दिलीप गायकवाड, अनंत शेलार, दिलीप तुकाराम दाभाडे, अरविंद गायकवाड आदींची मेहनत व योगदान मोलाचे ठरले. ज्येष्ठ कवी प्रभाकर ओव्हाळ व सचिन शेलार यांनी सूत्रसंचालन केले. मिरवणूक दरम्यान नागोठणे मोहल्ला येथे मुस्लिम समाज बांधवांनी भीम अनुयायी व बहुजन समाज बांधवांना थंड पेये सरबत देऊन आगळे वेगळे अभिवादन केले.

या कार्यक्रमास नगरसेवक परिषद मुंबई महाराष्ट्रचे अध्यक्ष राम भारत जगदाळे, सरपंच सौ.सुप्रियाताई संजय महाडिक, नागोठणे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी , बौ.पं. समिती सचिव नथुराम गायकवाड, माजी सरपंच ऋतुजाताई गणपत म्हात्रे, बौद्ध समाज युवा संघाचे अध्यक्ष जितेंद्र गायकवाड, प्राध्यापक सुनिल देवरे, प्रा. सुनिल देवरे, आदींसह मान्यवर धम्मबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रात्री वैचारिक व प्रबोधनात्मक असा व्ही जे म्युजिक आर्केस्ट्रा मुंबई प्रस्तुत सुप्रसिद्ध भीमगीतांचा एल्गार कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीमशक्ती मित्रमंडळ व रमाई महिला मंडळ नागोठणे, नालंदा बुद्धविहार कमिटी व पंचशील महिला मंडळ वरवठणे, भीमशक्ती मित्रमंडळ व रमाई महिला मंडळ आंबेघर, भीमशक्ती मित्रमंडळ रमाई महिला मंडळ पाटनसई, भिमप्रेरणा व यशोधरा महिला मंडळ हेदवली व ताम सोली यांचे महत्वाचे योगदान व सहकार्य लाभले. उपस्थित भिमानुयायी , धम्मबांधव, बहुजन बांधवांची सुग्रास भोजनाची उत्तम व्यवस्था केली होती.

# नेरळ स्टेशन परिसरात वीजपुरवठा खंडित

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळमध्ये वीजपुरवठा खंडित झाला होता. नेरळ स्टेशन परिसरातील वीज पुरवठा रात्री पासून खंडित झाल्याने स्थानिकांचे मोठे हाल झाले होते. नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून लवकरच पुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येत आहे.

नेरळ गावातील रेल्वे स्टेशन परिसर आणि स्टेशन आळी भागातील वीजपुरवठा कालपासून खंडित झाला होता. वीज पुरवठा करणारे वीज रोहित्र मध्ये बिघाड झाल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता. वीज रोहित्र जळाल्यामुळे रात्र कशी काढायची असा प्रश्न निर्माण झाला होता. अचानक वीजपुरवठा बंद पडला आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या पार्श्वभूमीवर एमएसईबी प्रशासनाने तातडीने आज दुपारी हालचाल करत नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम पूर्ण केले आहे. अधिकृत माहिती नुसार,रात्री पर्यंत वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात येणार आहे.

प्रशासनाकडून नागरिकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर तात्काळ एसी, पाण्याच्या मोटारी किंवा जड विद्युत उपकरणे सुरू करू नयेत. अशी विनंती करण्यात आली आहे. ही उपकरणे अर्धा ते एक तासाच्या अंतराने सुरू करावीत. जेणेकरून नवीन ट्रान्सफॉर्मरवर अचानक ताण येणार नाही.

नवीन बसवलेल्या ट्रान्सफॉर्मरचे संरक्षण आणि भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन महावितरण कडून करण्यात आले आहे.

# पोशीर आणि शिलार धरणांच्या कामांसाठी शेतकऱ्यांची संमती घेण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात होत असलेल्या शिलार आणि पोशीर धरणाला दोन्ही बाजूच्या संघर्ष समिती यांनी विरोध केला. १७ मार्चच्या मोर्चानंतर शासनाचेवतीने प्रांत अधिकारी यांनी विरोध करणाऱ्या संस्था यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बैठक बोलावली होती. या बैठकीत कर्जत तालुक्यात ही दोन्ही धरणे नको. असा एकमुखी ठराव घेण्यात आला. तर जोवर शेतकऱ्यांची संमती मिळत नाही तोवर प्रस्तावित धरण परिसरात कोणतीही कामे करू नयेत. असा निर्णय घ्यावा अशी मागणी केली. तर वन विभागाला त्यांच्या जमिनीच्या बदल्यात जमीन देणार असाल तर आम्हा शेतकऱ्यांना देखील जमिनीच्या बदल्यात जमीन द्यावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

कर्जत तालुक्यात पोशिर आणि शिलार या दोन ठिकाणी धरणे बांधणार आहे. या धरणांना शासनाने मंजुरी दिली असून



शासनाच्या भूमिकेला दोन्ही प्रस्तावित धरणांच्या परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. या धरणांना तीव्र विरोध करण्यासाठी १७ मार्च रोजी हजारो शेतकऱ्यांनी एकत्र येत मोर्चा काढला होता. या मोर्चाचे प्रसंगी कर्जत उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी पाटबंधारे खात्याचे प्रतिनिधी यांच्यासोबत आपण सर्वांची बैठक करू. असे आश्वासन दिले होते. त्यानुसार प्रांत अधिकारी कार्यालयात बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ, कर्जत तहसिलदार डॉ. धनंजय जाधव, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता संजीव जाधव, उप अभियंता संजीव

***“आम्ही शासन म्हणून पाटबंधारे खाते आणि शेतकरी यांचा समन्वय घालून देण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांचे जमिनीत जाऊन माती परिक्षण करताना संबंधित ग्रामपंचायतीना कळवावे,. कोणतीही वेगळी कामे करू नये. असे सूचना पाटबंधारे खात्याला आहेत.'***

***-प्रकाश संकपाळ, प्रांत अधिकारी***

***'शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की ठेकेदाराने माती परिक्षण करताना किंवा अन्य कोणत्याही कामासाठी येऊ नये. अशा सूचना देऊ. माती परिक्षण हे आम्ही पाटबंधारे विभाग करीत असून आम्हाला सहकार्य करावे.'***

***-संजीव जाधव, कार्यकारी अभियंता***

शिंदे, विनोद कंक यांच्यासह कर्जत पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल सोनोने, नायब तहसीलदार अजित पवार हे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीला शासनाचे वतीने धरणाला विरोध करणाऱ्या तीन संस्थाना निमंत्रित करण्यात आले होते. त्यात शिलार धरण प्रकल्पग्रस्त समिती, स्थानिक शेतकरी मंडळ बोरगाव पोशीर धरण विरोधी समिती आणि कर्जत तालुका आगरी समाज संघटना केले होते.

# ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक मंगेश कदम यांच्या हस्ते बालनाट्य शिबिर शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

संत शिरोमणी कलावंत आणि नवी मुंबई बालारंगभूमी आयोजित २५ एप्रिल ते सहा मे या कालावधीमध्ये विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे बालनाट्य शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरासाठी नवी मुंबईतील वय वर्ष सात ते वीस वयापर्यंत ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला सातत्याने २९ वर्ष श्रीहरी पवळे हे शिबिर आयोजित करीत असतात. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतात यावेळी ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक मंगेश कदम बालनाट्य उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

उपक्रमाबद्दलही कौतुक केले सहा मे रोजी बालनाट्य शिबिराचा समारोप असेल समारोप प्रसंगी विद्यार्थी विविध नाट्यछटा, नाटिका, नृत्य, गायन सादर करण्यात आहेत.



# पनवेलमध्ये हिवतापाबाबत व्यापक जनजागृती

## महानगरपालिकेकडून जागतिक हिवताप दिनानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक हिवताप दिनानिमित्त आज दिनांक २५ एप्रिल रोजी विविध ठिकाणी जनजागृती व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हिवताप जनजागृती, तपासणी व मोफत उपचार यावर विशेष भर देण्यात आला असून महानगरपालिका सातत्याने विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि मार्गदर्शन कार्यक्रम राबवत आले.



यानिमित्ताने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र. १२ (तळोजा फेज-२) अंतर्गत एल अँड टी सिडको बांधकाम कामगार वसाहतीत विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये मलेरिया तपासणीसाठी रक्त नमुने घेणे, तपासणी करणे तसेच हिवताप प्रतिबंधाबाबत सविस्तर जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात एमपीडब्ल्यू, एएनएम, लॅब टेक्निशियन तसेच इतर आरोग्य कर्मचारी सक्रियपणे सहभागी झाले होते. यावेळी रुग्णांना मोफत उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

याबरोबरच बांधकाम स्थळांवर विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या परिसरात आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. शाळांमध्ये आरोग्य चर्चांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये हिवतापाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली व जनजागृती रॅली काढण्यात आली.

महापालिकेच्या २७ आरोग्य केंद्रांच्या स्तरावर व्यापक हिवताप जागरूकता अभियान राबविण्यात येत असून, आवश्यकतेनुसार रुग्णांना वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पुढील उपचारांसाठी शिफारस करण्यात येत आहे. हिवताप नियंत्रणासाठी नियमित ताप रुग्ण सर्वेक्षण, कंटेनर सर्वे, कीटकजन्य आजाराबाबत जनजागृती करण्यात येते. तसेच हिवताप व इतर कीटकजन्य आजाराने बाधित रुग्णांना मोफत औषध उपचार करण्यात येतात. संबंधित भागात महापालिकेच्या वतीने नियमित फॉगिंग व कीटकनाशक फवारणी देखील करण्यात येत आहे.

महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली, शहर हिवताप अधिकारी डॉ. आकाश ठसाळे यांच्या देखरेखीखाली हे सर्व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

### नागरिकांना आवाहन

***पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कटिबद्ध असून, "हिवतापमुक्त पनवेल" या उद्दिष्टासाठी अशा उपक्रमांद्वारे सातत्याने प्रयत्न करत आहे. नागरिकांनीही घराभोवती पाणी साचू न देणे, डासांपासून बचाव करणे व वेळेवर तपासणी करून घेणे यांसारख्या उपाययोजना अवलंबून महानगरपालिकेला सहकार्य करावे तसेच याबाबत नागरिकांना काही तक्रार असल्यास ती पनवेल कनेक्ट ॲप किंवा ldsppanvelcorporation@gmail.com या ईमेल आयडी वरती नोंद करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.***

# उरणमध्ये पक्ष्यांच्या संख्येत घट

## पाणथळीची नष्ट होऊ लागल्याचा परिणाम

**उरण : वार्ताहर**

विविध कारणांनी उरणमधील पाणथळीची संख्या घटू लागल्याने दरवर्षी या परिसरात येणाऱ्या दोन ते अडीच लाख पक्षांच्या संख्येत घट झाल्याचे मत पर्यावरणवाद्यांनी व्यक्त केले आहे.

उरणचे खाडी किनारे आणि पाणथळी या हजारो पक्षाचे खासकरून फ्लेमिंगोचे उरण हे एक महत्वाचे ठिकाण होते, मात्र येथील पाणथळीवर होणारा मातीचा भराव, वाढती उष्णता आदी विविध कारणांमुळे येथील पाणथळी झपाट्याने नष्ट होऊ लागल्या आहेत. त्यामुळे पक्षी अन्नाच्या शोधात परिसरातील छोट्या पाणथळीवर येऊ लागले आहेत, मात्र या पाणथळी आणि येथील अन्न केव्हा पर्यंत असेल हे सांगता येत नाही. उरण परिसरात साधारणपणे ऑक्टोबर अखेरपर्यंत अनेक जातींचे पक्षी येथील पाणथळीवर दाखल होतात.

यामध्ये उरणच्या जेएनपीटी बंदर परिसर पाणजे, फुंडे, जासई, करळ आदी भागातील पाणथळीवर दरवर्षी हजारोंच्या संख्येने पक्षी येतात. हे पक्षी पाहून त्यांचे निरीक्षण करण्यासाठी शेकडो पक्षी प्रेमी या भागात येतात. याचे मुख्य कारण म्हणजे येथील खाडीत मिळणारे या पक्षांचे अन्न आहे. अनेक वर्षांपासून हा परिसरात हे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करीत येत आहेत, मात्र अनेक कारणांनी उरणच्या पाणथळ जागा हळूहळू नष्ट होऊ लागल्याने या ठिकाणी येणाऱ्या पक्षांची संख्या कमी होऊ लागली आहे. ही संख्या कमी होऊ नये येथील पाणथळ जागा टीकाव्यात यासाठी पर्यावरणवादी सातत्याने प्रयत्नशील आहेत. याकरिता न्यायालयीन लढाई ही ते लढत आहेत. या पाणथळीचे संवर्धन आणि संरक्षण व्हावे यासाठी ही लढाई सुरू आहे.

उरण आणि नवी मुंबई मध्ये येणारे पक्षी हे सैबेरिया या देशातून येत असले तरी यातील हजारो पक्षी हे गुजरात मधील कच्छ प्रांतात वास्तव्यास असतात. हजारो स्थलांतरित आणि स्थानिक पक्ष्यांचे ठिकाण असलेल्या प्रमुख पाणथळ जागा, एकतर गाडून किंवा आंतरभरतीच्या पाण्याचा प्रवाह रोखून पद्धतशीरपणे नष्ट केल्या जात आहेत. त्याचप्रमाणे समितीने तक्रार पेटी उघडली पाहिजे जेणेकरून सतर्क नागरिकांना त्यांच्या तक्रारी नोंदवता येतील.

उरणच्या मोठया पाणथळ जागा नष्ट झाल्याने सद्या अनेक पक्षी हे उरण पनवेल मार्गावरील उरण रेल्वे स्थानकांच्या शेजारील भरतीचे पाणी साचत होते हा पाणथळ परिसर ही मातीचा भराव टाकून बुजविण्यात आला आहे. त्यामुळे आता पक्षांना खाद्यपदार्थ शोधत बसावे लागणार आहे.

उरणच्या पाणथळी वेगाने नष्ट होत आहेत. त्यामुळे येथील पाणथळीवर येणाऱ्या दोन ते अडीच लाख पक्षी संख्या घटून ती जवळपास एक लाखाने कमी झाल्याचे मत पर्यावरणवादी निकेतन ठाकूर यांनी व्यक्त केले आहे. तर पक्षी हे जैवविविधता राखणारा महत्वाचा दुवा तसेच वातावरण आणि पाणी स्वच्छ ठेणारे देवदूत असल्याचेही स्पष्ट केले आहे.

## निवडक

### खारघरमध्ये ३२ लाखांची घरफोडी

**पनवेल :** स्वप्नपूर्ती, खारघर येथे घरफोडी करत चोरांनी ३२ लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलीस चोरांचा शोध घेत आहेत. २१ एप्रिल ते २४ एप्रिल दरम्यान रात्रीच्या सुमारास एल १९, स्वप्नपूर्ती, सेक्टर ३६ खारघर येथील दरवाजाची बनावट चावी बनवून चोरांनी घरात प्रवेश केला आणि घरफोडी करून ३२ लाख रुपये चोरून नेले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर खारघर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस चोरांचा शोध घेत आहेत.

### कॉपर केबलची चोरी

**पनवेल :** कॉपर केबलची चोरी केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २३ एप्रिल रोजी तीन अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. २३ एप्रिल रोजी युफोरिया को-ऑपरेटिव्ह सोसायटी, सेक्टर १६, खारघर या साइटवर मेन गेटच्या आत तीन अनोळखी ईसमानी कॉपर वायरचा १५ मीटरचा रोल चोरी करून नेला. या प्रकरणी खारघर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एक लाख सहा हजारांची फसवणूक

**पनवेल :** एटीएम कार्डद्वारे अकरा वेळा ट्रांजेक्शन करून एक लाख सहा हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

७० वर्षीय विजय शंकर महाजन हे कळंबोली, हायवे दर्शन सोसायटी येथे राहत असून ते एटीएममधून पैसे काढण्यासाठी एटीएम सेंटरमध्ये गेले. यावेळी एक इसम त्या ठिकाणी उभा होता. महाजन यांनी पैसे काढण्यासाठी कार्ड टाकले. यावेळी तो इसम त्यांच्या बाजूला उभा राहिला. मशीनमधून पैसे न निघाल्याने महाजन एटीएम कार्ड काढत असताना ते निघाले नाही. त्यामुळे त्या इसमाने पुन्हा एटीएम पिन टाकण्यास आणि कार्ड न निघाल्याने एटीएम मशीन वर दिलेले हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करून माहिती देण्यास सांगितले. त्यामुळे महाजन यांनी एटीएम पिन टाकला आणि हेल्पलाईन नंबर वर त्या इसमाने त्यांना मदतीसाठी सायंकाळी चार वाजता येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर महाजन तेथून निघून गेले. त्यानंतर मशीनमध्ये अडकलेले एटीएम कार्ड काढून एक लाख सहा हजारांची फसवणूक केली.

# खारघरमध्ये ४० लाखांचे दागिने चोरले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मारहाण करून चाळीस लाख ६० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना खारघरमध्ये घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २३ एप्रिल रोजी तीन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुशांत नामदेव मोरे (वय ४१ राहणार सेक्टर १२ खारघर) हे त्यांच्या घराच्याजवळ एफ लाईन कॉर्नर समोरील रस्त्यावर सेक्टर १२, खारघर या ठिकाणी त्यांचे चालक महेश हाटे, मित्र अभिनंदन हे कार पार्किंग करून पायी चालत चाळीस लाख साठ हजार रुपये किमतीचे दागिन्यांची पिशवी घेऊन मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घरी जात होते. यावेळी त्यांच्या पाठीमागून आलेल्या तिघांनी सुशांत मोरे यांना चाकूने मारहाण करून जखमी केले तसेच महेश हाटे आणि अभिनंदन यांना हाताने मारहाण केली आणि मोरे यांच्या हातातील ४० लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असलेली पिशवी जबरदस्तीने घेऊन ते पळून गेले.

# युईएस कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना व्यसनाच्या दुष्परिणामांचे मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

युईएस स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्समध्ये विदयार्थ्यांसाठी अँन्टी नार्कोटीक्स, नवी मुंबई तर्फे अवेर्नेस सेशनचे आयोजन केले होते.



स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सौ.सिमरन दहिया, समन्वयक,माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका ह्यांच्या हस्ते पी.एस.आय सुहास तावडे, हेड कॉन्स्टेबल शाम जगताप आणि जितेंद्र कांबळे, ए.पी.आय (उरण पोलिस स्टेशन) राजेश खांडवे, स्वयंसेवक दर्शन नाईक व पी.एन. श्री. बाळू मगरे ह्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पी.एस.आय सुहास तावडे यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करताना सिगारेट, दारु, चरस, गांजा व ड्रग्स ह्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. तर स्वयंसेवक दर्शन नाईक यांनी अंमली पदार्थांमुळे माणसाच्या शरिरावर व मनावर होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल सांगितले व व्यसनाच्या आहारी न जाता एखादा छंद जोपासायलाचा सल्ला दिला. कार्यक्रम संपण्यापूर्वी तावडे यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची प्रतिज्ञा सर्वांकडून वदवून घेतली.

# इर्शाळवाडी येथे "क्रीडा फेस्ट"चा जल्लोष; इन्फिनिटी फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इर्शाळवाडी, येथील जिल्हा परिषद शाळा, नानीवली येथे इन्फिनिटी फाउंडेशन यांच्या वतीने "क्रीडा फेस्ट"चे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. आदिवासी भागातील लहानग्यांना खेळाच्या माध्यमातून आनंद, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या क्रीडा महोत्सवात सॅक रेस, लिंबू चमचा रेस, पोटॅटो रेस तसेच बुक बॅलन्सिंग अशा विविध पारंपरिक आणि मनोरंजक स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत स्पर्धांमध्ये आपली चपळता, एकाग्रता आणि संघ भावना दाखवून दिली.

स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तब्बल ८० विजेत्यांचा पदक देऊन गौरव करण्यात आला. याशिवाय सर्व सहभागी विद्यार्थ्यांना आकर्षक टोप्या तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकले.

यावेळी अध्यक्ष आयुफ अकुला म्हणाले, "आदिवासी भागातील प्रत्येक मुलामध्ये अपार क्षमता दडलेली आहे. योग्य संधी, प्रोत्साहन आणि आनंददायी वातावरण दिल्यास ही मुले नक्कीच मोठी यश मिळवू शकतात. 'क्रीडा फेस्ट' हा केवळ खेळांचा कार्यक्रम नसून, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक छोटा प्रयत्न आहे. भविष्यातही अशा अनेक उपक्रमांद्वारे आम्ही समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करू."

कार्यक्रमाचा समारोप केक कापून करण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण वातावरण अधिक आनंदमय आणि स्नेहपूर्ण झाले. स्थानिक नागरिक, शिक्षक व पालकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आयुफ अकुला, उपाध्यक्षा वेदांतिक जाधव, सरचिटणीस प्रणय उसटकर, सल्लागार अक्षया चितळे, सहसचिव समृद्धी पोटे व अनिकेत झंगोले तसेच ट्रायबल डेव्हलपमेंट सेक्रेटरी कार्तिक शर्मा यांनी योगदान दिले.



# मसाला, पापड बनवून कुटूंबाला आर्थिक मदतीचा हातभार

मुरूड-जंजिरा तालुक्यातील मु.सर्वे कशिद ग्रामपंचायत हद्दीतील १० महिला एकत्र येऊन दि. ०५ मार्च २००७रोजी एकत्र येऊन सर्वेश्वरी महिला स्वयंमसहाय्यता समुहाची स्थापना केली. महिलांच्या एकत्रिकरणाने त्यांच्यामधील एकत्रितपणाची भावना वाढत गेली. सुरुवातीच्या काळात या समुहामध्ये फक्त मासिक वर्गणी जमा करणे व जमा केलेली वर्गणी गटातील सदस्यांना गरज पडत असल्यास अंतर्गत कर्ज म्हणून देणे हे काम केले. समुहामध्ये नियमित बैठका होत असतात व या बैठकांना सर्व सदस्य हजर असतात. या समुहाने स्वच्छ अभियान पोषण महासप्ताह व कोविड-१९ अशा कार्यक्रमामध्ये भाग घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले आहे.



मु.सर्वे कशिद या ग्रामपंचायतीमध्ये गावातील महिलांनी एकत्र येऊन सर्वेश्वरी महिला स्वयंसहायता समुह स्थापन केला. हा समुह स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमार्फत स्थापन करण्यात आला. पुढच्या काही कालावधीमध्ये या समुहाचा फिरता निधी फॉर्म भरून त्यांनी फिरता निधीचा लाभ घेतला. यानंतर अभियाना अतंर्गत सर्वेश्वरी महिला स्वयंसहायता समुहाची MIS ऑनलाईन प्रक्रिया करण्यात आली.

सर्वेश्वरी महिला स्वयंमसहाय्यता समुहाला व्यावसाय करण्यासाठी मोठ्या रक्कमेची आवश्यकता होती. त्यामुळे या गटाने अभियानामार्फत बँक कर्जासाठी फॉर्म भरुन पहिले कर्ज रक्कम २,००,००० रुपये एवढे बँकेकडून कर्ज २००९ रोजी प्राप्त करुन घेतले. त्यानंतर पहिल्या कर्जाची परतफडे केल्यानंतर बँक शाखाधिकारी यांचा विश्वास प्राप्त करुन सर्वेश्वरी महिला स्वयंमसहाय्यता या गटाने सन २०१४ मध्ये रक्कम ७५००० रुपये एवढे दुसरे बँक कर्ज प्राप्त करुन घेतले २०१८ मध्ये या गटाला तिसरे कर्ज प्राप्त झाले सदर कर्ज हे रक्कम १,५०,००० रुपये एवढे रक्कमेचे होते. या बँक कर्जामधून महिलांनी मसाला व पापड बनविणे हा व्यवसाय सुरु करुन समुहाला व आपल्या कुटूंबाला आर्थिक मदतीचा हातभार लावला आहे.

सर्वेश्वरी महिला स्वयंमसहाय्यता समुहाने व्यावसाय करण्याचे ध्येय ठेवून सुरुवातीच्या काळात समुहातील महिलांनी मसाला व पापड बनविण्याचा व्यवसाय करण्यावर भर दिला. सर्वेश्वरी महिला स्वंयसहाय्यता समुह हा समुद्राच्या जवळ असल्यामुळे व नैसर्गिक कशिद बीच लाभलेले गाव असल्याने या गावांना पर्यटन स्थळ प्राप्त झाले आहे. याचा या गटाने परिपुर्ण फायदा घेत काशिद हद्दीतील येणारे सर्व हॉटेल यांना विविध प्रकारचे मसाला व पापड बनवुन विक्री करण्याचे काम या गटाने सुरळीत चालू ठेवले आहे. या व्यावसायाने समुहाचा आर्थिकरित्या खुप प्रमाणात फायदा होत गेला आहे.

सर्वेश्वरी महिला स्वयंमसहाय्यता समुह हा नेहमी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना यांचा ऋणी आहे. कारण अभियानाच्या हातभाराने समुह आपले यश प्राप्त करु शकला आहे. सर्वेश्वरी समुहातील महिलांची एकत्रीतपणा, एकमेकांना हातभार लावणे, महिलां मधील व्यवसाय करण्याची चिकाटी, तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांची यंत्रणने दिलेला हातभार यामुळे या समुहाने आपले यश संपादन केले.

**-संजीवनी जाधव, सहायक संचालक, विमाका, नवी मुंबई**

# पनवेल मनपातर्फे कलावंतांसाठी खारघर, कळंबोली व पनवेल येथे अभिनय प्रशिक्षण

## शिक्षक-प्राध्यापकांसाठी विशेष बॅच

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ मे ते १९ मे असे नऊ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबीर घेण्यात येणार आहे. यात कलावंत शिक्षक-प्राध्यापकांसाठी विशेष बॅचचे नियोजन करण्यात आले आहे.



पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात नाट्य संस्कृती चळवळीस अधिक चालना मिळावी, कलावंतांना मोठे व्यासपीठ मिळावे व सांस्कृतिक उपक्रम वाढावेत या करिता कलावंतांना अभिनयाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे.

युवा गटासाठी सकाळी ९ ते १२ व प्रौढ गटासाठी दुपारी २ ते ५ अशी वेळा असतील. सर्व कलावंतांची चर्चेअंती यात बदल केला जाईल. त्याचप्रमाणे पनवेल आणि खारघर येथे एक बॅच ही उच्चस्तरीय अभिनय प्रशिक्षणासाठी गतवर्षीच्या प्रशिक्षणापेक्षा अधिक वरिष्ठस्तरीय प्रशिक्षण मिळावे यासाठी अशी व्यवस्था करण्यात आली आहे.एक विशेष बॅच शिक्षक प्राध्यापकांसाठी असेल. शाळा स्नेहसंमेलन विविध उपक्रम शिवजयंती, भारतरत्न डॉ.आंबेडकर जयंती त्याचप्रमाणे आपले राष्ट्रीय सण, उत्सव यात पनवेल मनपा परिसरातील विविध शाळा सहभागी होतात. या शाळांमधील मुलांना अभिनय नाट्य विषयक प्रशिक्षण आवश्यक आहे, त्याकरीता संबंधित शाळेतील शिक्षकांना अधिक प्रशिक्षित केले तर त्याचा मोठा उपयोग होऊ शकतो. पनवेल, कळंबोली व खारघर येथे कलावंतांसाठी हे शिबिर मोफत आहे.

प्रत्येक केंद्रावर दोन गट

अभिनय प्रशिक्षण शिबीरासाठी प्रत्येक सेंटरवर दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. यात पहिला गट विभाग म्हणजे वय वर्षे ८ ते १६ हा युवा गट व प्रौढ गट म्हणजे १७ ते ६५ वयांपर्यंत कलावंतांना यात सहभाग घेता येईल. हे शिबीर मोफत आहे. संख्या र्यादेमुळे प्रथम येणाऱ्या ३०-३० नाट्यकर्मींनाच या शिबिरासाठी प्रवेश दिला जाईल. नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवरांकडून शिबीरात मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच शेवटी सर्वांचे सादरीकरण होईल. सर्व शिबीरांर्थीना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

नाव नोंदणी व संपर्क

या शिबिरासाठी आपली नाव नोंदणी दिनांक ५ मे २०२६ पर्यंत करावी.असे आवाहन पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्यावतीने करण्यात येत आहे.

शिबीरात सहभागी होण्यासाठी संबंधितांनी पुढील क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. शामनाथ पुंडे- प्रमुख कार्यवाह- अ.भा.मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा. (९८२१७५८१४७), स्मिता गांधी, सह कार्यवाह- अ.भा.म.नाट्य परिषद, पनवेल शाखा. (९३२३४८९६९३) वर्षा कुलकर्णी जनसंपर्क अधिकारी (७७१५८१५१२७).

## संपादकीय

# विकासाचा दुहेरी वेग

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आज विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहेत. मेट्रो, रस्ते आणि इतर पायाभूत प्रकल्पांमुळे शहराचा चेहरामोहरा झपाट्याने बदलत आहे. याचवेळी स्टार्टअप्स आणि डिजिटल इकॉनॉमी देशाच्या प्रगतीला नवे पंख देत आहेत. भौतिक आणि डिजिटल या दोन्ही आघाड्यांवरील ही झेप विकसित भारताच्या स्वप्नाला अधिक वास्तववादी बनवणारी ठरत आहे.

**मुंबई हे देशाचे आर्थिक इंजिन मानले जाते आणि या इंजिनाला अधिक वेग देण्याचे काम सध्या पायाभूत सुविधांच्या विस्तारातून सुरू आहे. गेल्या काही वर्षांत मेट्रो प्रकल्पांचा वेग वाढला असून शहरात विविध मार्गांवर मेट्रो सेवा सुरू होत आहेत. त्यामुळे केवळ प्रवास सुलभ झाला नाही, तर नागरिकांच्या वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होत आहे. रोजच्या गर्दीतून सुटका होत असल्याने जीवनमान सुधारण्यास मदत होत आहे तसेच रस्ते, उड्डाणपूल आणि कोस्टल रोडसारख्या प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होत आहे. उपनगर आणि मुख्य शहर यांच्यातील अंतर कमी झाल्याने कामाच्या आणि व्यवसायाच्या संधी अधिक व्यापक होत आहेत. या पायाभूत सुविधांचा थेट परिणाम आर्थिक क्षेत्रावरही दिसून येत आहे. ज्या भागांमध्ये मेट्रो किंवा नवीन रस्ते पोहचले आहेत, तेथे रिअल इस्टेटची मागणी वाढली आहे. उद्योग आणि सेवा क्षेत्रासाठी नवीन केंद्र निर्माण होत आहेत. परिणामी गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत आहे आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळत आहे. या सर्व घडामोडींमुळे मुंबई आणि एमएमआर हे केवळ आर्थिकच नव्हे, तर विकासाच्या दृष्टीनेही देशाचे अग्रस्थान अधिक बळकट करत आहेत. दुसरीकडे भारतातील स्टार्टअप्स आणि डिजिटल इकॉनॉमी ही नव्या युगाची ओळख बनली आहे. तरुण पिढी नवनवीन कल्पनांसह व्यवसाय क्षेत्रात उतरते आहे आणि पारंपरिक चौकटी मोडून नवे मार्ग तयार करत आहे. ई-कॉमर्स, फिनटेक, हेल्थटेक, एडटेक अशा विविध क्षेत्रांमध्ये भारतीय स्टार्टअप्स जागतिक स्तरावर आपली छाप सोडत आहेत. डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या प्रमाणामुळे अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक आणि वेगवान बनत आहे. युपीआयसारख्या प्रणालींनी व्यवहार सुलभ केले असून छोट्या व्यावसायिकांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वांनाच त्याचा फायदा होत आहे. सरकारकडूनही या क्षेत्राला मोठे प्रोत्साहन दिले जात आहे. स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे उद्योजकांना आवश्यक भांडवल, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध होत आहेत. नवीन धोरणांमुळे नवकल्पनांना चालना मिळत असून, भारत जागतिक स्टार्टअप हब बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. यामुळे रोजगारनिर्मिती वाढत असून देशाच्या आर्थिक वाढीत महत्त्वाची भर पडत आहे. भौतिक पायाभूत सुविधा आणि डिजिटल इकॉनॉमी यांचा परस्परपूरक संबंधही लक्षात घेण्यासारखा आहे. उत्तम रस्ते आणि मेट्रो कनेक्टिव्हिटीमुळे व्यवसायांना विस्तारासाठी आवश्यक आधार मिळतो, तर डिजिटल तंत्रज्ञानामुळे त्या व्यवसायांना अधिक व्यापक बाजारपेठ मिळते. उदाहरणार्थ, एखादा छोटा उद्योजक डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहचू शकतो, आणि चांगल्या कनेक्टिव्हिटीमुळे त्याची सेवा वेळेत आणि कार्यक्षमतेने पुरवता येते. मुंबईतील पायाभूत सुविधांचा विस्तार आणि देशातील डिजिटल क्रांती यांचा संगम म्हणजे नव्या भारताची नांदी आहे. हा प्रवास केवळ शहरांच्या विकासापुरता मर्यादित नसून तो प्रत्येक नागरिकाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करणारा आहे. अशा या परिवर्तनाच्या काळात, सकारात्मक दृष्टीकोन ठेवून पुढे जाणे हीच खरी यशाची गुरूकिल्ली ठरेल.**

# पालघरच्या वनिता उराडे यांची व्यवसायात गगनभरारी

जिद्द आणि प्रशिक्षणाची जोडः पालघरच्या वनिता उराडे यांचा नर्सरी व्यवसायातील गगनभरारी...

"जिद्द, मेहनत आणि योग्य दिशा मिळाली की यशाचे शिखर सहज सर करता येते," हे पालघर जिल्ह्यातील रोठे (केळवा रोड) येथील सौ. वनीता विनोद उराडे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. केवळ १० वी पर्यंत शिक्षण झालेल्या वनीता ताईंनी घरची बेताची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी उचललेले पाऊल आज एका यशस्वी व्यवसायात रूपांतरित झाले असून, केंद्र आणि राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेचे त्या एक चालते-बोलते उदाहरण बनल्या आहेत.



सुरुवातीला शेती कामात गुंतलेल्या वनीताताईंना स्वतःचा काहीतरी स्वतंत्र व्यवसाय असावा, अशी तीव्र इच्छा होती. ही संधी त्यांना स्वयं सहायता गट (SHG) आणि ईएपी कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळाली. याद्वारे त्यांना ठाणे येथील 'महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थे'ची (RSETI) माहिती मिळाली. याच संस्थेत त्यांनी २३ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत 'पॉली हाऊस आणि शेड नेट शेती' या विषयावर १० दिवसांचे सखोल प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणाने त्यांच्यातील सुप्त कौशल्याला वाव दिलाच, पण त्यासोबतच आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि व्यवसाय व्यवस्थापनाचा नवा दृष्टीकोनही दिला.

प्रशिक्षण पूर्ण होताच त्यांनी वेळ न घालवता २७ फेब्रुवारी २०२३ रोजी आपल्या स्वप्नाला मूर्त रूप दिले. सुमारे १ लाख ५ हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून त्यांनी 'वर्मी कंपोस्ट आणि नर्सरी' व्यवसायाचश्रीगणेशा केला. बँकिंग कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास अधिक दुणावला. आज त्यांच्या रोपवाटिकेमध्ये विविध प्रकारची झाडे आणि उच्च दर्जाचे गांडूळ खत उपलब्ध असून, ग्राहकांच्या पसंतीस उतरल्यामुळे त्यांचा हा व्यवसाय अल्पावधीतच स्थिरावला आहे.

एकेकाळी केवळ गृहिणी आणि शेतकरी म्हणून वावरणाऱ्या वनीता ताई आज दरमहा १७ हजार रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवत आहेत. केवळ स्वतःसाठी रोजगार निर्माण न करता, त्यांनी आपल्या कुटुंबाला एक भक्कम आर्थिक आधार दिला आहे. या प्रवासात त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल लक्षणीय आहे; वाढलेला आत्मविश्वास, प्राप्त झालेले स्वावलंबन आणि समाजात निर्माण झालेली एक यशस्वी उद्योजिका ही ओळख त्यांच्या कष्टाचे फळ आहे. भविष्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे त्यांचे स्वप्न असून, त्यांचा हा यशस्वी प्रवास पालघरमधील शेकडो महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

**-जिमाका**, पालघर

# बॉलिवूड अभिनेते विनोद खन्ना

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते विनोद खन्ना यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९४६ रोजी पेशावर (पाकिस्तान) येथे झाला. भारताची फाळणी झाल्यानंतर त्यांचे कुटुंब मुंबईमध्ये आले. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यांच्या वडिलांचे नाव किसनचंद खन्ना आणि आईचे नाव कमल होते. विनोद खन्ना यांच्या वडिलांचा कपडे आणि रसायनांचा व्यापार होता.

विनोद खन्ना यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील सेंटमेरी स्कूलमध्ये झाले. १९६० नंतर पुढील शिक्षण नाशिकमधील बर्नेस स्कूल या निवासी शाळेमध्ये झाले. मुंबईतील सिडनहम कॉलेजमधून त्यांनी पदवी घेतली. त्यांना हिंदी, मराठी, इंग्लिश, पंजाबी या भाषा चांगल्या बोलता येत होत्या. शालेय वयात अभिनयाशी संबंधित केलेल्या कार्यक्रमांमुळे त्यांना पुढे अभिनयाची आवड निर्माण झाली; पण याच क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांच्या घरून त्यांना विरोध होता.

प्रसिद्ध अभिनेते सुनील दत्त यांच्या मन का मीत (१९६८) या चित्रपटामधून विनोद खन्ना यांना पहिल्यांदा संधी मिळाली. यात त्यांनी खलनायकाची भूमिका साकारली. त्यांच्या सुरुवातीच्या पूरब और पश्चिम, सच्चा झुठा, आन मिलो सजना, मस्ताना, ऐलान इत्यादी चित्रपटांमधून त्यांनी खलनायकाच्या भूमिका साकारल्या. हम तुम और वो (१९७१) हा नायक म्हणून त्यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर गुलजार यांची कथा, पटकथा आणि दिग्दर्शन असलेला मेरे अपने (१९७१) हा बंगाली आपनजन याचा हिंदीमध्ये रूपांतर केलेला चित्रपट विनोद खन्नांसाठी महत्त्वाचा ठरला. यामध्ये त्यांनी श्याम या दमदार तरुणाची भूमिका केली होती. हा चित्रपट गाजला. पुढे गुलजार यांच्या अचानक (१९७३) या चित्रपटात त्यांनी रणजित खन्ना या प्रामाणिक सैनिकी अधिकाऱ्याची केलेली करारी भूमिका लक्षणीय ठरली.



याच टप्प्यावर ते खलनायकाच्या भूमिकेकडून नायकाच्या भूमिकेकडे वळले. नायक अथवा सहनायक अशा भूमिका साकारत त्यांनी आपली यशस्वी वाटचाल कायम ठेवली. फरेबी, हत्यारा, आप की खातिर, राजमहल, द बर्निंग ट्रेन, इम्तिहान, खूनपसीना, मेमसाब, प्रेम कहानी, इन्कार, कुर्बान, दयावान, हेराफेरी, अमर अकबर अँथनी, हाथ की सफाई, इन्सान, नेहले पे देहला, रेश्मा और शेरा, सरकारी मेहमान, दौलत, लेकिन, मीरा, हमशकल, शंकर शंभू, आरोप, परिचय, एक हसीना दो दिवाने अशा अनेक चित्रपटांमधून त्यांनी त्यांच्या अभिनयाचा ठसा उमटवला. प्रकाश मेहरा दिग्दर्शित हाथ की सफाई ( १९७५) या चित्रपटामध्ये रणधीर कपूर यांच्यासोबत विनोद खन्ना सहनायक होते. एकीकडे मोठा तस्कर तर दुसरीकडे प्रेमळ नवरा अशी भूमिका या चित्रपटात त्यांनी निभावली. प्रकाश मेहरा दिग्दर्शित मुकद्दर का सिकंदर (१९७८) या चित्रपटामध्ये अमिताभ बच्चन यांच्या मित्राची - विशाल आनंद या वकीलाची - भूमिका विनोद खन्ना यांनी केली. त्यांच्या कारकीर्दीतील हा एक लोकप्रिय चित्रपट आहे. राखी, विनोद खन्ना आणि अमिताभ बच्चन यांच्या प्रेमाचा त्रिकोण या चित्रपटामध्ये पाहायला मिळतो. दोघांची पडद्यावरील मैत्री प्रेक्षकांना भावली. या चित्रपटामधील विशाल या पात्रासाठी विनोद खन्ना यांना फिल्मफेअरचे सर्वश्रेष्ठ सहायक अभिनेत्याचे नामांकन मिळाले. अतिशय डौलदार चाल, भेदक नजर आणि आत्मविश्वासपूर्ण देहबोली हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होते. लता मंगेशकर निर्मित आणि गुलजार दिग्दर्शित लेकिन हा विनोद खन्नांच्या कारकिर्दीतील एक उल्लेखनीय चित्रपट आहे.

विनोद खन्ना यांनी चित्रपटाबरोबरच राजकारणातही सक्रिय सहभाग घेतला आणि ते यशस्वीही ठरले. १९९७ साली त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आणि ते पंजाबमधील गुरुदासपूर मतदार संघातून तीन वेळा खासदार म्हणून निवडून आले. ते पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री होते. पुढे परराष्ट्र व्यवहार खात्यातही कार्यरत होते.

विनोद खन्ना यांना त्यांच्या मृत्युनंतर चित्रपट कारकीर्दीसाठी दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वयाच्या ७० व्या वर्षी मुंबईमध्ये २७ एप्रिल २०१७ रोजी त्यांचे कर्करोगाने त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

### व्हिडीओ एडिट करणाऱ्यांसाठी इन्स्टाग्रामचे नवीन ॲप

आपल्यातील अनेक जण आज कन्टेन्ट क्रिएटरच्या क्षेत्रात उतरताना दिसत आहेत. दिवसभरात आपण काय करतो याची छोटीशी झलक मिनी ब्लॉगद्वारे, इन्स्टाग्राम रील्सद्वारे दाखवली जाते, पण हे सगळे छोटे छोटे क्षण एकत्र करून दाखविण्यासाठी तो व्हिडीओ एडिटसुद्धा करावा लागतो. तर आजकाल लॅपटॉपर नाही, तर मोबाईलमध्येच व्हिडीओ एडिट करतात. तुम्हाला मोबाईलवर व्हिडीओ एडिट करायला आवडत असेल, तर ही बातमी खास तुमच्यासाठीच आहे, कारण आता इन्स्टाग्रामने व्हिडीओ एडिट करणाऱ्यांचा विचार करून एक खास ॲप आणले आहे.



मेटाने टिकटॉकच्या कॅपकटप्रमाणेच एडिट्स हे व्हिडीओ एडिटिंग ॲप सादर केले आहे. एडिट्स हे एक मोफत ॲप आहे, जे तुमच्या विचारांना इन्स्टाग्राम रील्समध्ये रूपांतरित करण्यासाठी विविध फीचर्ससुद्धा देते. हे ॲप अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही युजर्ससाठी उपलब्ध असणार आहे.


जानेवारीमध्ये अमेरिकेने टिकटॉक आणि कॅपकटवर बंदी घालण्याची घोषणा केली तेव्हा मेटाने पहिल्यांदा एडिटस् लाँच करण्याची घोषणा केली होती. कॅपकट भारतात कधीही उपलब्ध नव्हते, पण ते अमेरिकन युजर्समध्ये एक लोकप्रिय व्हिडीओ एडिटिंग ॲप होते. ॲप बंदीमुळे एक पोकळी निर्माण झाली असती, ज्याचा फायदा घ्यायचा, असे इन्स्टाग्रामने ठरवले.इन्स्टाग्राम एडिटस् ॲप युजर्सना फोनच्या कॅमेऱ्याचा वापर करून फुटेज कॅप्चर करण्याची आणि कोणत्याही वॉटरमार्कशिवाय त्यांचे प्रोजेक्ट एक्स्पोर्ट करण्याची परवानगी देतो. हे ॲप क्लिप-लेव्हल प्रिसिजन, ऑटो-एनहान्स टूल्स व एआय इमेज निमेशन यांसारख्या फीचर्ससह अचूक नियंत्रणसुद्धा देईल. ते क्रिएटर्सना ट्रेंड समजून घेण्यास आणि त्यानुसार व्हिडीओ तयार करण्यास मदत करण्यासाठी कन्टेंटसुद्धा देईल.

थर्ड-पार्टी व्हिडिओ एडिटिंग ॲप्सव्यतिरिक्त एडिट्स युजर्सना मेटाच्या लायब्ररीमधून गाणे ॲक्सेस करण्याची परवानगी देईल. थ्रेड्सप्रमाणेच एडिट्स वापरण्यासाठी युजर्सचे इन्स्टाग्राम अकाउंट असणे आवश्यक आहे. त्यामुळे एका क्लिकवर परफॉर्मन्स ट्रॅक करणे आणि कन्टेन्ट इन्स्टाग्रामवर शेअर करणेदेखील सोपे होते.

# ज्योतिर्विद शंकर बाळकृष्ण दीक्षित

भारतीय ज्योतिषशास्त्र व गणिती शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासाचा आढावा घेऊन त्यावरून त्यांनी काही ग्रंथांचे व घटनांचे काळ ठरविले तसेच भारतीय ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाला पुनश्च चालना दिली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

शंकर दीक्षित यांचा जन्म व प्राथमिक शिक्षण रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुड गावी झाले. याच काळात त्यांनी घरी संस्कृत व वैदिक विषयांचा प्राथमिक अभ्यास पूर्ण केला. नंतर दोन वर्षे त्यांनी दापोलीच्या कोर्टात उमेदवारी केली व त्याच काळात इंग्रजीचे थोडे अध्ययनही केले. नंतर ते पुण्याच्या प्रशिक्षण महाविद्यालयात दाखल झाले व १८७४ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. याच काळात त्यांनी दुसऱ्या शाळेत इंग्रजीचे अध्ययनही केले. तद्नंतर त्यांनी रेवदंडा, ठाणे व बार्शी येथे मुख्याध्यापक आणि पुढे धुळे व पुणे येथील प्रशिक्षण महाविद्यालयांत अध्यापक म्हणून काम केले. या काळातच त्यांनी ज्यातिषशास्त्र व गणित यांचा तपशीलवार अभ्यास केला आणि भारतीय ज्योतिषशास्त्रातील विविध सिद्धांतांची माहिती करून घेतली. यासाठी त्यांनी पाचशेहून अधिक संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केला होता. अशा प्राचीन भारतीय



## निमित्त

ग्रंथांमधील उल्लेखांवरून काही ग्रंथांचे काळ त्यांनी निश्चित केले. उदा., शतपथ ब्राह्मणातील एका ऋचेच्या आधारे त्यांनी त्या ग्रंथाचा काळ इ. स. पू. ३००० वर्षे, तसेच वेदांगज्योतिषाचा काळ इ. पू. १४०० वर्षे असा निश्चित केला. यावरून इतिहास व ज्योतिषशास्त्राचा विकास यांच्यात संगती लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शिवाय वैदिक काळात कोणत्या ज्योतिषशास्त्रीय गोष्टी माहित होत्या, तेही त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. ग्रीक आणि भारतीय ज्योतिषशास्त्रीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास करून भारतीय ज्योतिषशास्त्र हे स्वतंत्र वेध व संशोधन यांद्वारे भारतातच विकसित झालेले शास्त्र आहे, हे त्यांनी सिद्ध केले. पंचांग शोधनाचे शास्त्र, नक्षत्रसंस्था व अंकगणित हे भारतीयांनी जगाला दिल्याचे त्यांनी दाखवून दिले. उलट राशी व वार ही मूळची भारतीय नव्हेत, असेही त्यांना आढळून आले. त्यांचा फलज्योतिषावर विशेष विश्वास नव्हता, पण ते त्यावर विचार करीत होते.

दीक्षित यांनी मराठी व इंग्रजीत विपुल लेखन केले असून त्याद्वारे सोप्या व मनोरंजक भाषेत विविध शास्त्रीय विषयांची माहिती करून दिलेली आहे. विद्यार्थिबुद्धिवर्धिनी, सृष्टचमत्कार, ज्योतिर्विलास, भारतीय ज्योतिःशास्त्र, धर्ममीमांसा आणि सोपपत्तिक अंकगणित, धर्ममीमांसा आणि सोपपत्तिक अंकगणित हे ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. इंडियन कॅलेंडर हा इंग्रजी ग्रंथ त्यांनी आणि रॉबर्ट सेवेल यांनी मिळून लिहिला असून त्यातील इ. स. ३०० ते १९००पर्यंतच्या तिथी तारखांचा मेळ घालणारी सारणी दीक्षितांची आहे. इंडियन ॲंटिक्वेरी एपिग्राफिका इंडिका, शालापत्रक व ज्योतिषकल्पतरू या मासिकांत व नेटिव्ह ओपिनियन या दैनिकात विविध शास्त्रीय विषयांवर त्यांनी लेख लिहिले होते. लेले व मोडक यांच्या सहाकार्याने त्यांनी सायन पंचांग काही दिवस काढले. या सहकाऱ्यांच्या मृत्यूनंतरही त्यांनी ते थोडे दिवस पदरमोड करून चालविले होते. ते विषमज्वराने पुण्याला मृत्यू पावले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### दररोज तूप खाण्याचे फायदे आणि नुकसान जाणून घ्या

तूप हे अतिशय पौष्टिक आणि आरोग्यदायी अन्न आहे. त्यातील विविध घटक शरीरासाठी उपयुक्त आहेत. पौष्टिक आणि सुगंधी तूप अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि संतुलित चरबीने समृद्ध आहे.

आपल्यापैकी बरेच जण रोजच्या जेवणात आवर्जून चमचाभर साजूक तूप खातात. साजूक तूप योग्य प्रमाणात खाल्ल्याने त्याचे आपल्या आरोग्याला अनेक फायदे मिळतात. शरीराला फायदेशीर ठरणारे अनेक पोषक घटक तुपामध्ये असतात. त्यामध्ये साधारण 900 ग्रॅम कॅलरी असून, सर्वांत जास्त ऊर्जा त्यातून मिळते.



तुपामध्ये अनेक पौष्टिक घटक असतात, तुपामध्ये ए, डी, ई, के इत्यादी जीवनसत्त्वे, ओमेगा 3 व ओमेगा 6 यांसारखी संतुलित फॅटी ॲसिड, असे अनेक पौष्टिक घटक असतात. तुपामध्ये आढळणाऱ्या आरोग्यदायी चरबीमुळे आपले आरोग्य चांगले राहते. त्यामुळे शरीराला दिवसभर ऊर्जा मिळण्यासोबतच आपले अनेक आजारांपासून संरक्षण होते. तुपाच्या सेवनाने पचनक्रियाही सुरळीतपणे कार्यरत राहते.

तूप हे पचण्यासाठी अत्यंत सोपे असते. तुपामध्ये ब्युटीरेट हे एक प्रकारचा शॉर्ट चेन फॅटी सिड आहे, जे पोटाच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. तूप पाचन तंत्राच्या पेशींचे पोषण करते आणि जळजळ कमी करते. तसेच तूप त्वचेसाठीही खूप फायदेशीर आहे. कारण- ते त्वचेचे पोषण करते आणि तिला हायड्रेटेड ठेवते. तुपातील पोषक घटक त्वचेला घट्ट ठेवतात.

तुम्ही दररोज तुपाचा थोडासा भाग घेतल्याने तुमचे एकूण आरोग्य सुधारू शकते. त्यामध्ये हाडे मजबूत होऊ शकतात आणि आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते. तथापि, ते असाही सावधगिरीचा इशारा देतात की, तुपाचे मोठ्या प्रमाणात सेवन केल्याने शरीराचे गंभीर नुकसानदेखील होऊ शकते.

वजन कमी होण्यास मदत : वजन कमी करायचे असेल, तर तूप खाऊन वजनावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य आहे. तज्ज्ञांच्या मते कमी प्रमाणात तूप खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होऊ शकते. कारण- तूप पचन सुधारण्यास आणि चयापचय वाढविण्यास मदत करते.

मुलांच्या स्मरणशक्ती वाढीस साह्यभूत : मुलांनी तुपाचे सेवन केल्यास त्यांची स्मरणशक्ती, दृष्टी आणि रोगप्रतिकार शक्ती वाढू शकते.

# जिल्हा प्रशासनाकडून २२५ दरडप्रवण गावांना हायटेक सुरक्षा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा प्रशासनाने मोठे पाऊल उचलले आहे. पावसाळ्यात दरड कोसळण्याच्या घटनांमुळे होणारी जीवितहानी टाळण्यासाठी रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून आता थेट गावागावांत सेंट्रलाईज्ड पब्लिक ॲड्रेस सिस्टिम (सीपीएएस) बसवण्यात येत आहे.

आता पर्यंत २२५ गावांपैकी १०० गावांमध्ये ही सिस्टिम कार्यान्वित करण्यात आली असून येत्या पावसाळ्या पूर्वी उर्वरित १२५ गावांमध्येही कार्यान्वित होईल अशी माहिती जिल्हा आपत्ती निवारण अधिकारी सागर पाठक यांनी दैनिक पुढारी शी बोलताना दिली आहे.



रायगड जिल्ह्यात एकुण ३९२ गावे दरडप्रवण आहेत.त्यातील दरडप्रवण श्रेणी-१ मध्ये १८ गावे आहेत. श्रेणी-२मध्ये ७१, श्रेणी-३ मध्ये १५९ ,श्रेणी-४ मध्ये ४९,आणि दरडप्रवण श्रेणी ५मध्ये २२ गावांचा समावेश आहे. त्यांतील ७३ गावांचे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने विशेष सर्वेक्षण केले असल्याचे पाठक यांनी सांगीतले.पोलादपूर मध्ये सर्वाधिक १४० गावे दरडप्रणव३९२ दरडप्रणव गावांपैकी सर्वाधिक १४० गावे पोलादपूर तालुक्यांत तर महाड तालुक्यांत १२१ गावे आहेत. जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यांत अलिबाग ९, मुरुड ९, कर्जत ५,खालापूर १२,रोहा २०,सुधागड ९, म्हसळा १४,श्रीवर्धन १२,माणगांव २२, पेण १३, तर पनवेल व तळा तालुक्यांत प्रत्येकी ३ गावे आहेत. उरण तालुक्यांत दरडप्रणव गांव एकही नाही. कशी काम करणार सीपीएएस प्रणाली?

सीपीएएस या प्रणालीचे मुख्य नियंत्रण अलिबाग येथील जिल्हा नियंत्रण कक्षाकडे आहे. हवामान विभागाकडून पावसाचा किंवा धोक्याचा इशारा मिळाल्यास, नियंत्रण कक्षातून एकाच वेळी सर्व गावांमध्ये ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना प्रसारित केल्या जातील.


जीएसएम आधारित यंत्रणा

जिल्हा स्तरावरून अधिकारी थेट बोलून सूचना देऊ शकतील किंवा रेकॉर्ड केलेले संदेश ऐकवता येतील. तातडीची परिस्थिती उद्भवल्यास ग्रामस्थांना सतर्क करण्यासाठी सायरन वाजवण्याची सुविधा आहे. जीएसएम आधारित ही यंत्रणा मोबाईल नेटवर्कवर चालत असल्याने कोणत्याही ठिकाणाहून ऑपरेट करणे शक्य आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यास ही यंत्रणा बंद पडू नये यासाठी त्याला २१ दिवसांचा इन्व्हर्टर बॅटरी सपोर्ट देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ही बॅटरी अवघ्या दोन तासांत जलद चार्ज होऊ शकते. पावसाळ्यात अनेकदा दुर्गम भागातील संपर्क तुटतो.

अशा वेळी ही सेंट्रलाईज्ड सिस्टिम अत्यंत प्रभावी ठरणार आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातून एकाच वेळी २२५ ठिकाणी हवामानाचा अंदाज पोहोचवणे शक्य झाल्यामुळे, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी प्रशासनाला पुरेसा वेळ मिळेल, असा विश्वास सागर पाठक यांनी व्यक्त केला आहे.या उपक्रमामुळे रायगडमधील दरडग्रस्त गावांच्या सुरक्षिततेत मोठी भर पडणार असून, तंत्रज्ञानाचा वापर करून आपत्ती निवारण अधिक सक्षम करण्यावर जिल्हा प्रशासनाचा भर आहे.

## पेणमध्ये अतिक्रमण तोडून रस्ता काँक्रीटीकरणाचे काम युद्धपातळीवर

**पेण : रामप्रहर वृत्त**



रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण शहरामध्ये गेली अनेक दशकांपासून पेणकरांना खड्डेमय आणि अरुंद रस्त्यांचा त्रास सहन करावा लागत होता. मात्र आता पालिका प्रशासनाने ठोस निर्णय घेऊन पावसाळ्यापूर्वीच पेण शहरातील महत्त्वाचे रस्त्यांच्या रुंदीकरणासह काँक्रीटीकरणाचे काम हाती घेतल्याने समस्त पेणकर समाधान व्यक्त करत आहेत.

पेणच्या बाजारपेठेचे जे गल्लीत रूपांतर झाले आहे त्याचे देखील रस्त्यात रूपांतर व्हावे आणि पेणकर ग्राहकांना तेथे देखील खरेदी करत असताना मोकळा श्वास घेऊन खरेदी करता यावी असा देखील महत्वाचा निर्णय पालिका प्रशासनाने घ्यावा असे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

पेण पालिका निवडणुका होऊन दोन ते तीन महिने होतात न होतात तोच तातडीने सत्ताधारी आणि पालिका प्रशासनाने पेण शहरातील विकासकामांना सुरुवात केली आहे. निवडणुका झाल्यानंतर नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आमदार रविंद्र पाटील यांनी आपल्या भाषणात बोलताना पालिका निवडणुकीत प्रचारादरम्यान आम्ही निवडणुका आचारसंहिता संपताच शहरातील रस्ते आणि त्याचे रुंदीकरण याला प्राधान्य देऊ असे आश्वासन दिले होते. आज शहरातील याच रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि रुंदीकरण होत असल्याने दिलेल्या शब्दाची पूर्तता होत असल्याचे दिसून येत आहे.

## मनसेकडून कर्जत शहरातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने कर्जत शहरातील पदाधिकारी यांच्या नियुया करण्यात आल्या. मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनाच्या कर्जत शहरातील विविध पदनियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी सर्व नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र दिले. कर्जत शहरातील महिला संघटन वाढीसाठी आणि संघटनात्मक बळकटीसाठी करण्यात आलेल्या या नियुयांमध्ये महिला पदाधिकारी नियुक्त करण्यात आले. तर अनेक महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. कर्जत शहर महिला सेना उपाध्यक्ष म्हणून तृप्ती पवार, विदुला केळकर आणि साक्षी वाडेकर यांची निवड करण्यात आली आहे.

# श्रीवर्धनमध्ये बांधकामांनंतरचा रेचगा ठरतोय धोकादायक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात सध्या निवासी प्रकल्प, रिसॉर्ट्‌स आणि होम-स्टे यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून शहराच्या विकासाला वेग आला आहे. मात्र या वाढत्या बांधकामांच्या पार्श्वभूमीवर मूलभूत स्वच्छता आणि जबाबदारीकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर उरलेला रेचगा (मलबा) रस्त्याच्या कडेला तसेच गटारांमध्ये दीर्घकाळ पडून राहिल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शहरातील विविध पाखाडी, आळ्या तसेच मुख्य मार्गालगत उभारल्या जाणाऱ्या इमारती, रिसॉर्ट्‌स आणि निवासस्थाने यांमुळे बांधकाम साहित्याची मोठ्या प्रमाणात ने-आण सुरू आहे. लोखंडी सळ्या, चिरे, रेती, क्रश सॅन्ड आणि खडी यांसारखे साहित्य अनेक वेळा रस्त्याच्या कडेला किंवा नाल्यांमध्ये टाकले जाते. काम सुरू असताना काही प्रमाणात ही बाब अपरिहार्य असली तरी काम पूर्ण झाल्यानंतरही तोच मलबा तसेच राहणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

परिणामी, रस्त्यावर साचलेला रेचगा हळूहळू वाहनांच्या वर्दळीमुळे सर्वत्र पसरत असून दुचाकीस्वारांसाठी तो घसरडा आणि धोकादायक ठरत आहे. अनेक ठिकाणी वळणांवर किंवा अरुंद रस्त्यांवर हा मलबा अधिक प्रमाणात दिसून येत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. पादचाऱ्यांनाही चालताना अडथळे निर्माण होत . वृद्ध नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

याशिवाय, गटारांमध्ये टाकण्यात आलेल्या बांधकाम साहित्यामुळे पाण्याचा निचरा अडतो, परिणामी पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता वाढते. यामुळे आरोग्याच्या दृष्टीनेही धोका निर्माण होऊ शकतो, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.नागरिकांच्या मते, शहराचा विकास महत्त्वाचा आहे, मात्र तो शिस्तबद्ध आणि जबाबदारीने होणे गरजेचे आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर संबंधितांनी स्वतःहून मलबा उचलणे ही किमान अपेक्षा आहे.



**शहरात सुरू असलेल्या बांधकामांदरम्यान काही ठिकाणी विटा, रेती, माती तसेच इतर साहित्य गटारांमध्ये व रस्त्यांच्या कडेला ठेवले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही उर्वरित मलबा वेळेवर हटवला जात नसल्याने नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो. यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होऊन अपघाताची शक्यता वाढते, ही गंभीर बाब आहे. या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन नगरपरिषदेच्या वतीने संबंधित बांधकाम मालकांना तात्काळ नोटीस देण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई केली जाईल. शहर स्वच्छ, सुरक्षित व सुबक ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.**

**-ॲड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन नगर परिषद**

दरम्यान, नागरिकांनी श्रीवर्धन नगरपरिषदेने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित इमारत मालक व बांधकाम व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली आहे. तसेच, बांधकामासाठी परवानगी देताना मलबा व्यवस्थापनाबाबत स्पष्ट अटी घालून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची गरजही व्यक्त होत आहे.

शहराचा विकास आणि नागरिकांची सुरक्षितता यांचा समतोल राखणे ही काळाची गरज असून, स्वच्छ आणि सुरक्षित श्रीवर्धन घडवण्यासाठी प्रशासन व नागरिक यांची संयुक्त जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरत आहे.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् (Gyan Bharatam) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने सदरील हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन ती स्विकारेल.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत.

कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर क्लस्टर केंद्र,

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे क्लस्टर केंद्र,

आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र,भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे स्वतंत्र केंद्र.महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर श्रीमती. अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

सदर सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत "Gyan Bharatam" हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच NCC, NSS स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, आपल्याकडे जर काही हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲप वर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा.

## पन्हळघर बुद्रुक येथे श्री काळभैरव मंदिर जीर्णोद्धार सोहळा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील पन्हळघर बुद्रुक येथे श्री काळभैरव मंदिराच्या जीर्णोद्धार सोहळ्याने गावात अभूतपूर्व उत्साह आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले. मंदिराचा जीर्णोद्धार हा केवळ बांधकामाचा उपक्रम नसून, तो गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकतेचा एक सुंदर संगम ठरला.

या भव्य सोहळयात गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण वर्ग, महिला आणि लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान देत हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. ज्येष्ठ मंडळींच्या अनुभवाचे मार्गदर्शन, तरुणांची ऊर्जा आणि नियोजन, तसेच महिलांचा आयोजन, स्वच्छता, पूजाविधी आणि पाहुणचारातील सक्रिय सहभाग यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला वेगळेच रूप प्राप्त झाले.

मंदिराच्या गाभाऱ्याची नव्याने करण्यात आलेली रचना हे या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले. अत्यंत कलात्मक आणि



आध्यात्मिकतेची अनुभूती देणारी ही रचना पाहताच भक्तांच्या मनात शांतता आणि समाधानाची भावना निर्माण होत होती. हवा आणि प्रकाश यांचा संतुलित वापर करून गाभाऱ्यात प्रसन्न आणि थंड वातावरण राखण्यात आले आहे, जे भाविकांसाठी विशेष सुखद अनुभव देणारे ठरत आहे.

तसेच मंदिराची संपूर्ण रचना पारंपरिक शैली जपत आधुनिकतेची जोड देऊन साकारण्यात आली आहे. स्वच्छता, शिस्तबद्ध व्यवस्था आणि आकर्षक सजावट यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. मंदिराचा नवा अवतार पाहून गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि अभिमान स्पष्ट दिसून येत होता.

या जीर्णोद्धार सोहळ्याने गावातील एकोप्याचे आणि सहकार्याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. मुंबईकर मंडळी आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन केलेल्या या कार्यामुळे केवळ मंदिराचा विकास झाला नाही, तर गावाची सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकी अधिक दृढ झाली आहे.

खरोखरच हा सोहळा डोळ्याचं पारण फेडणारा ठरला असून, प्रत्येक गावकऱ्याच्या मनात आनंद आणि अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. सर्व संबंधितांच्या अथक परिश्रमांना आणि श्रद्धेला मनापासून सलाम व्यक्त करण्यात येत असून, हा उपक्रम भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# श्रीवर्धन पंचायत समिती सभापती सुचिन किर यांचा वेळास येथे सत्कार

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन पंचायत समितीच्या सभापतीपदी निवडून आल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुचिन किर यांचा त्यांच्या मूळ गावी, वेळास येथे ग्रामस्थांच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला.

श्री कालभैरव मंडळाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वेळास येथील ग्रामस्थ मंगेश दिवेकर आणि संदीप दिवेकर यांच्या हस्ते सभापती सुचिन किर यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या गावातील सुपुत्र श्रीवर्धन तालुक्याच्या पंचायत समितीच्या सभापती पदावर विराजमान झाल्याबद्दल संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

**तटकरे कुटुंबियांप्रती व्यक्त केली कृतज्ञताः**

सत्काराला उत्तर देताना सभापती सुचिन किर भावूक झाले होते. आपल्या भाषणात त्यांनी खासदार सुनीलजी तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे आणि आमदार अनिकेतभाई तटकरे यांचे आभार मानले. यावेळी त्यांनी तटकरे साहेबांनी माझ्यावर जो विश्वास दाखवून मला उमेदवारी दिली आणि आज मी या पदावर पोहोचलो, हे उपकार मी आयुष्यात कधीही विसरणार नाही, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

पुढील कामाचा संकल्प सोडताना सभापती सुचिन किर म्हणाले की, "तालुक्यात जास्तीत जास्त विकासकामे करण्याचा माझा मानस आहे. शासनाच्या विविध योजना प्रत्येक गावागावात आणि शेवटच्या सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन."

या सोहळ्याप्रसंगी सौ. वासंती गुणाजी, प्रकाश दिवेकर, दीपक वाजे यांच्यासह गावातील प्रमुख कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने वेळास परिसरातील महिला वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री कालभैरव मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**फेर स्वारस्य अभिव्यक्ती Expression Of Interest (EOI)**

रायगड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित प्लॉट नं. ०७ सेक्टर नं. १३ खांदा कॉलनी (प) एच.डी.एफ.सी. बँक शेजारील इमारत तळमजला + ३ मजले भुखंड क्षेत्रफळ १०००,०३ चौ. मी. (४० सभासद) या इमारतीचा पुर्नविकास करणेकरिता व्यवस्थापनांमार्फत **प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट** (PMC) ची नेमणूक करणेबाबत दि. २१ जानेवारी २०२६ रोजीच्या वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिद्ध करणेत आली होती. तथापी काही प्रशासकिय कारणास्तव सदर (EOI) सुचना पत्र रद्द करणेत येत आहे.

तरी रायगड सहकारी गृहनिर्माण सोसायटीच्या पुर्नविकास कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट (PMC) ची नेमणूक करणेकरिता सोसायटीमार्फत फेर स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिद्ध करणेत येत आहे. इच्छुक संस्था/पक्ष/संघटना (FARM) यांनी त्यासाठी सोसायटीकडे रु. २५०/- भरणा करून कोरी निविदा घेवून जाणे आहे.

इच्छुकांनी निविदेनुसार आपले सिल बंद ऑफरपत्र दि. ०४/०५/२०२६ रोजी सांयकाळी ७.०० वाजेपर्यंत सोसायटी कार्यालयात सादर करावयाचे आहे.

भेटण्याची वेळ सोसायटी ऑफीस सायंकाळी ६.०० ते ७.३० वा.

संपर्क क्रमांक ९८९२२७८१४४/९८६९४५७२७०/८४२२०००९५

sd/- Treasurer sd/- Secretary sd/- Chairman

RAIGAD CO-OP HOUSING

Plot No 7, Sector 13, Khanda Colony New Panvel,(W) 410206

**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**दुबार लिलाव सुचना क्रमांक २ (२०२६-२७)**

**(तिसरा व अंतिम पुकार)**

मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे खाली नमुद केलेली वाहने आहे त्या स्थितीत निविदा मागवून विक्री करणेसाठी मोहरबंद निविदा **दि. २७/०४/२०२६ ते दि. ०५/०५/२०२६, दुपारी ३.०० वाजे** पर्यंत मागविण्यात येत आहेत.

कोरे निविदा फॉर्म (नियम व अटी आणि शेडयुल बी सह) **रक्कम १०००/- भरून दि. २७/०४ /२०२६ ते दि. ३०/०४/२०२६ पर्यंत** सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) सामान्य प्रशासन विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग कुंटेबाग, येथून उपलब्ध होतील.

निश्चित केलेल्या उच्चतम किंमतीच्या (अपसेट प्राईज च्या अधारावर संबधित निविदा धारकाने सादर केलेली रक्कम वाहनांची अंतिम किंमत निश्चित करणेत येईल.

| अ.क्र | वाहनाचा प्रकार | वाहनाचा क्रमांक | वाहन निरिक्षणासाठी ठेवण्यात आलेले ठिकाण | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | होंडा सिटी | MH-४६- G-०००१ | कुंटेबाग, अलिबाग | २०००/- |
| २ | महिंद्रा जीप | MH-०६- AA -०२९३ | पंचायत समिती श्रीवर्धन | २०००/- |
| ३ | महिंद्रा जीप | MH-०६- AA -९९६३ | पंचायत समिती माणगांव | २०००/- |

कोणतेही कारण न देता एक वा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांना राखून ठेवण्यात आलेला आहे.

**सही/-**
**नेहा भासले (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद अलिबाग**

**जा.क्र.राजिप/साप्रवि/लेखा-२/२०१५/२०२६**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**
**दिनांक-२४/४/२०२६**

# मोरबे धरणात ४३ टक्के जलसाठा

## पाणी जपून वापरण्याचे आयुक्तांचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात केवळ ४३ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, १०३ दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती महापालिकेने दिली. यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

शुक्रवारी झालेल्या महापालिकेच्या महासभेत मोरबे धरणाच्या पाणीसाठ्याबद्दल आयुक्त शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिका क्षेत्राला मोरबे आणि बारवी धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. मोरबे धरणाची एकूण साठवण क्षमता १९०.८९० दशलक्ष घनमीटर असून सध्या ८२.५५७ दशलक्ष घनमीटर म्हणजेच सुमारे ४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

यापैकी एक महिन्याचा राखीव साठा वगळल्यानंतर प्रत्यक्ष वापरासाठी सुमारे २७ टक्के पाणी उपलब्ध आहे. सध्याच्या वापराच्या दरानुसार हा साठा ७ ऑगस्ट



२०२६ पर्यंत, म्हणजेच सुमारे १०३ दिवस पुरेल, अशी माहिती आयुक्तांनी दिली. हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा पर्जन्यमान सरासरीच्या ९२ ते ९४ टयांपर्यंत राहण्याची शक्यता आहे. २००७ ते २०२५ या कालावधीत मोरबे परिसरात सरासरी ३६१७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी साधारण ३५०० ते ३६०० मिमी पावसाची आवश्यकता असते.

मात्र यंदा सुमारे ३३०० मि.मी. पावसाचा अंदाज असल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली असल्याचे आयुक्तांनी सांगितले. सध्या पाणीकपातीचा निर्णय घेतला नसला, तरी परिस्थितीचा आढावा घेऊन भविष्यात त्याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. पुढील वर्षीही पाणीपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी आतापासूनच नियोजन करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा, वाहन धुण्यासाठी पाणी वापरणे टाळावे, तसेच पाणी साठवण टाक्या ओसंडून वाहणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.

### ‘एल-निनो’चा परिणाम

कमी पडण्याची शक्यता पाणीपुरवठा विषयक सद्यस्थिती विशद करताना आयुक्तांनी सध्या ‘एल-निनो’ या जागतिक हवामान बदलामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या जलवितरण विषयक उपाययोजना आणि लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून नागरिकांचे यामध्ये अपेक्षित असलेले सहकार्य याविषयी भाष्य केले. सन २०२६ मध्ये ‘एल-निनो’ या जागतिक हवामान बदलामुळे भारतातील मोसमी वाऱ्यावर परिणाम होऊन या वर्षी सरासरी पावसाचे प्रमाण ९२ टक्के ते ९४ टक्के इतके राहणार असल्याचे हवामान विभागाने अंदाज वर्तविलेला आहे याची माहिती आयुक्तांनी दिली. याविषयी मुख्यमंत्री महोदयांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना भाष्य केले असल्याचेही त्यांनी सांगितले.

# उरणची वीज यंत्रणा ॲक्शन मोडवर; पावसाळापूर्वीची कामे प्रगतीपथावर

**उरण : बातमीदार**

पावसाळ्यात वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी उरण महावितरणतर्फे मान्सूनपूर्व देखभाल मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत १० विभागांतील सुमारे ५० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सध्याही अनेक कामे महावितरण विभागाने हाती घेतले आहेत. पावसाळापूर्वी सर्व कामे करणे हे त्यांचे लक्ष आहे.

उपअभियंता विजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात आली. तसेच जीटीपीएस सब-स्टेशन ब्रेकर दुरुस्ती, मुख्य वीजवाहिन्यांतील सैल कनेक्शनची तपासणी व दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मर देखभाल आदी कामे करण्यात आली.

धोकादायक वीज खांब बदलण्यासाठी सर्वेक्षणही करण्यात आले. करंजा, मोरा आणि चिरनेर परिसरात ही मोहीम राबविण्यात आली असून उर्वरित भागांत टप्प्याटप्प्याने कामे केली जाणार आहेत. नागरिकांना पूर्वसूचना देऊन वारंवार माहिती दिली जात आहे. ज्या भागांत कामे होणार आहेत, तेथील नागरिकांना मोबाइल ॲपद्वारे पूर्वसूचना दिली जात आहे.

पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी सर्व आवश्यक खबरदारी घेतली जात असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. पावसाळा पूर्वीची कामे प्रगतीपथावर असून उरणची वीज यंत्रणा आता ॲक्शन मोडवर दिसत आहे.

# महिलेस मारहाण; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

डोक्यावर आणि हातावर कुकर मारून महिलेला जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२८ वर्षीय महिला यांना त्यांचे दिर दिनेश मोरया आणि सासरे लाला मोरया यांनी त्या मुलांसह नोकरी करण्यासाठी घर सोडून लखनऊ, उत्तर प्रदेश या ठिकाणी जात असल्याच्याकारणावरून आणि इतर कारणांवरून भांडण केले आणि महिलेला आणि त्यांच्या पतीला शिवीगाळ आणि लाथा बुयांनी मारहाण केली. तसेच घरातील कुकर महिलेच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले. यावेळी त्या स्वतःचा बचाव करत असताना त्यांच्या दोन्ही हातावर कुकर मारला आणि त्यांची हाताची बोटे फ्रॅक्चर झाली.

# गव्हाण विद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## दोन लाख अठ्ठ्याऐंशी हजार रुपयांचे मानकरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एनएमएमएस अर्थात नॅशनल मीन्स कम मेरिट शिष्यवृत्तीसाठी रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या सहा विद्यार्थ्यांनी आपल्या प्रज्ञेची चुणूक दाखवून शिष्य वृत्तीधारक होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. इयत्ता आठवी मध्ये शिकणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर दिल्या जाणाऱ्या या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४८ हजाराप्रमाणे ही शिष्यवृत्ती (पुढील चार वर्षांसाठी वार्षिक १२००० रुपये याप्रमाणे) प्राप्त होणार आहे.

स्पर्धात्मक परीक्षेतील उत्तुंग यशा बद्दल विद्यार्थ्यांचे व एन एम एम एस शिष्यवृत्ती विभागाच्या प्रमुख वृषाली म्हात्रे व इतर सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाच्या वतीने सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे.



प्रथमेश आगीवले | तन्मय कोळी | अनुज पाटील | कु. आरोही कोळी | कु.श्रावणी कोळी | कु. कोमल शिरसाट

विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्युनिअर विभागाच्या स्थानिक शाळा समितीचे सदस्य व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, विजय घरत व ॲड.राहुल घरत यांच्यासह विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, जुनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख संजय उगले आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी

प्रथमेश आगिवले, तन्मय कोळी, अनुज पाटील, कुमारी आरोही कोळी, कुमारी श्रावणी कोळी व कुमारी कोमल शिरसाट हे सहा शिष्यवृत्तीधारक ठरले असून त्यांना भारत सरकारच्या वतीने दोन लाख ८८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.

# नवी मुंबई विमानतळावरून दररोज १८ हजार प्रवाशांची ये-जा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या डिसेंबर महिन्यापासून प्रवासी सेवेत दाखल झालेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात प्रवासीसंख्या वाढत आहे. सध्या दैनंदिन प्रवासी संख्या १८ हजारांपर्यंत पोहोचली असून या वर्षाच्या अखेरीस ही संख्या प्रतिदिन ५० हजार प्रवासी इतकी होईल असा अंदाज आहे. देशांतर्गत वाहतुकीत इंडिगो आघाडीवर आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २९ मार्चपासून उन्हाळी सुट्टीचे विस्तारित वेळापत्रक लागू झाले आहे. या माध्यमातून दुर्गापूर, जामनगर, हुबळी, डेहराडून, बरेली, हिंडन, बागडोगरा, विझाग, मेंगळुरू, दीव, गोव्यातील दोन्ही विमानतळे, तसेच महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नागपूर अशा विविध विमानतळांवर जाण्यासाठी विमानसेवा सुरू झाली आहे. या



विस्तारत्या सेवेच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई विमानतळाने देशातील सर्वात व्यस्त पहिल्या दहा विमानतळांच्या यादीत आपले स्थान निश्चित केले आहे.

नवी मुंबई विमानतळावरून सकाळी ६ ते रात्री ११ दरम्यान विमानसेवा सुरू आहे. या विमानतळावरून चार महिन्यांत एकदा विक्रमी २१ हजार ५०० प्रवाशांनी प्रवास केला आहे. इतर जुन्या विमानतळांच्या तुलनेत नवी मुंबई विमानतळावरील प्रवासी संख्या कमी असली तरी या विमानतळावरून इतर राज्यांसाठीची मिळणारी सुविधा प्रवाशांसाठी महत्त्वाची आहे.

अयोध्या, वाराणसीसारखी तीर्थक्षेत्रे, तसेच दुर्गापूर, जामनगरसारख्या औद्योगिक शहरांमध्ये जाण्यासाठी नागरिकांना नवी मुंबई विमानतळ सोयीचे पडत आहे. दिल्लीसारख्या शहरामध्ये प्रवासी मोठ्या संख्येने जात आहेत. तसेच ‘टीअर-२’, ‘टीअर-३’ शहरांशी जोडले गेल्याने ही सेवा प्रवासीकेंद्रित करण्याचा प्रयत्नही होत आहे.

येत्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमानांची ये-जा सुरू होईल. त्यानंतर पुणे जिल्ह्यातील प्रवाशांनाही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिक सोयीचे होईल आणि प्रवासीसंख्या वाढेल, असा अंदाज आहे. सध्या या विमानतळावरून प्रतिदिन १५६ विमानांची ये-जा होते, तर मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रतिदिन ९५० विमानांची वाहतूक होते.

### वर्षअखेरीस दैनंदिन ५० हजार प्रवासी

नवी मुंबई विमानतळावरून यंदाच्या उन्हाळी हंगामात आंतरराष्ट्रीय मार्गावर विमान सेवा सुरू होण्याची अपेक्षा होती. मात्र आखाती युद्धांमुळे आंतरराष्ट्रीय विमानसेवेला विलंब झाला. वर्षअखेरपर्यंत नवी मुंबई विमानतळावरून दररोज ५० हजार प्रवासी आणि जवळपास ३८० विमानांची वाहतूक होण्याची अपेक्षा आहे.

# नवी मुंबईत रुग्णालयांच्या आधुनिकीकरणाला गती : एमआरआय व कॅथलॅब सेवा स्वस्त दरात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी महापालिका रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक कॅथलॅब तसेच एमआरआय केंद्र उभारण्याच्या लोकपयोगी अशा प्रस्तावांना शुक्रवारी झालेल्या स्थायी समिती सभेत मंजुरी देण्यात आली. या महत्त्वाच्या प्रस्तावामुळे शहरात हृदयविकार, मेंदूविकार तसेच इतर गंभीर आजारांवरील निदान, उपचार सेवा इतर शहरांच्या तसेच खासगी रुग्णालयांच्या तुलनेत खूपच स्वस्त होणार आहे. वेगवेगळ्या उत्पन्न गटांतील नागरिकांना या सेवेचा उपयोग होणार असल्याने महागड्या चाचण्यांना एक मोठा सवलतीचा पर्याय महापालिकेने उपलब्ध करून दिला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांनी सव्वा वर्षापासून या प्रकल्पांवर काम करण्यास सुरुवात केली होती. आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी, डॉक्टर या प्रस्तावावर काम करत होते. वाशी आणि ऐरोली भागांत महापालिकेच्या मालकीच्या वास्तू आहेत. या ठिकाणी ही केंद्रे सुरू व्हावीत अशा पद्धतीचे नियोजन होते. साधारण वर्षभरापूर्वी आयुक्त शिंदे यांनी अर्थसंकल्पातही या महत्त्वाकांक्षी योजनांची घोषणा केली होती. वर्षभरानंतर ही केंद्रे प्रत्यक्षात सुरू होण्याचा महत्त्वाचा टप्पा शुक्रवारी मार्गी लागला.

महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, वाशी येथील सार्वजनिक



रुग्णालयात सुमारे ४६.४६ कोटी रुपयांच्या खर्चातून ‘बाय-प्लेन कॅथलॅब’ उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच ऐरोली येथील रुग्णालयात सुमारे १४.९५ कोटी रुपयांच्या खर्चातून ‘सिंगल प्लेन कॅथलॅब’ उभारण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे हृदयविकार व मेंदूविकारांवरील तातडीच्या उपचारांसाठी आवश्यक सुविधा महापालिकेच्या रुग्णालयांत उपलब्ध होणार आहेत. सध्या अशा प्रकारच्या उपचारांसाठी रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागत असून त्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. नव्या सुविधांमुळे ॲंजिओग्राफी, ॲंजिओप्लास्टी, स्ट्रोकवरील उपचार तसेच रक्तवाहिन्यांशी संबंधित

### वाशी-ऐरोली येथील दोन केंद्रांवर लवकरच सुविधा

विविध प्रक्रिया शहरातच करता येणार असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

वाशी येथील रुग्णालयात एमआरआय केंद्र सुरू करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली आहे. हे केंद्र कंत्राटी पद्धतीने पुढील दहा वर्षांसाठी चालविण्यात येणार असून सुमारे ३३.१८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या अंतर्गत मेंदू, मणका, सांधे, पोट तसेच रक्तवाहिन्यांच्या विविध तपासण्या उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे महापालिका हद्दीतील रुग्णांसाठी एमआरआय तपासणीचे दर नियंत्रित ठेवण्यात आले आहेत. पहिल्या वर्षात साध्या एमआरआय तपासणीसाठी १७७५ रुपये, तर कॉन्ट्रास्टसह तपासणीसाठी १८१० रुपये आकारले जाणार आहेत.

पुढील वर्षांमध्ये दरात टप्प्याटप्प्याने वाढ होऊन दहाव्या वर्षात हे दर अनुक्रमे २१२२ व २१६३ रुपयांपर्यंत मर्यादित राहतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले. महापालिका हद्दीबाहेरील रुग्णांसाठी याच दरांपेक्षा सुमारे ५० टक्के अधिक शुल्क आकारले जाणार आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांअंतर्गत पात्र लाभार्थींना ही सेवा मोफत देण्याची तरतूदही केली आहे.

> **शहरातील नागरिकांसाठी या सुविधा अतिशय उपयुक्त ठरतील. या दोन केंद्रांमधील सुविधांचे लवकरच लोकार्पण केले जाईल. त्यामुळे आरोग्य चाचण्यांवर होणारा मोठा खर्च सामान्य नागरिकांसाठी आवाक्यात येऊ शकेल. उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा परवडणाऱ्या दरात उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.**
> **-सागर नाईक,** सभागृह नेते, नवी मुंबई महानगरपालिका

# हिवताप दिनी नवी मुंबईत जनजागृती शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दि. २५ एप्रिल रोजी नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने ‘जागतिक हिवताप दिन’ निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सन २०२६ च्या जागतिक हिवताप दिनाचे ‘हिवताप दुरिकरणासाठी कटिबद्ध : आता हे शक्य आहे. आता हे केलेच पाहिजे’ - हे घोषवाक्य जाहीर करण्यात आलेले आहे.

दि. २५ एप्रिल २०२६ रोजी जागतिक हिवताप दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय शिबीरांचे आयोजन करुन हिवताप व साथरोग



आजारांबाबत जनजागृती करण्यात आली. यामध्ये ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने तसेच डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून, घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने दाखवून, जनजागृती करण्यात आली. यासोबत उष्णतेच्या लाटेमध्ये होणारे परिणाम व घ्यावयाची दक्षता, तसेच येणाऱ्या पावसाळा कालावधीमध्ये साथीचे आजार टाळण्याकरिता घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देण्यात आली. त्याकरिता एकूण २५ शिबीरांचे आयोजन करुन १०८७३ नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

यामध्ये विशेष बाब म्हणून दैनंदिन जॉगींग किंवा मॉर्निंग वॉकसाठी नागरिक जातात अशा ठिकाणी ज्वेल ऑफ नवी मुंबई, राजीव गांधी जॉगर्स पार्क, सेक्टर-१०, वाशी आणि निसर्ग उद्यान, से-१४, कोपरखैरणे येथे सकाळी ६:०० ते १०:०० या वेळेत शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी १९०५ नागरिकांना माहिती देण्यात आली.

याशिवाय दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी नेरुळ, वाशी व ऐरोली सार्वजनिक रुग्णालय येथे जनजागृती शिबिरांसोबतच पथनाट्य सादरीकरण केले असून सदरची पथनाटये यापुढे दिनांक ५ मे २०२६ पर्यंत एकूण ३१ ठिकाणी करण्यात येणार आहेत.

तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर कर्मचारी यांनी आपले घर व कार्यालय डासउत्पत्ती मुक्त ठेवण्याबाबत प्रतिज्ञा घेण्यात आली. दिनांक २५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर खाजगी वैद्यकिय व्यवसायिक व रुग्णालयधारक यांची सभा घेण्यात येणार आहे.

# नवी मुंबईत जनगणनेसाठी ३७०० प्रगणक-पर्यवेक्षकांना प्रशिक्षण

## डिजिटल प्रकियेची तयारी अंतिम टप्प्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारतर्फे २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तयारीला वेग आला असून ३७०० प्रगणक व पर्यवेक्षकांना १५ दिवसांचे सविस्तर प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे. यंदा जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असून नागरिकांना घरबसल्या स्व-नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जनगणना प्रक्रियेची अचूक आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी पहिल्या टप्प्यात मास्टर ट्रेनरमार्फत ४५ फील्ड ट्रेनर्सना ६ ते ८ एप्रिल या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात डिजिटल ॲपचा वापर, माहिती संकलनाची पद्धत, तसेच नागरिकांशी प्रभावी संवाद साधून माहिती गोळा करण्याची कौशल्ये यावर विशेष भर देण्यात आला.

दुसऱ्या टप्प्यात हेच प्रशिक्षित फील्ड ट्रेनर्स



शहरातील प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देत आहेत. २३ एप्रिलपासून सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गांचे आयोजन महानगरपालिकेच्या आठही विभाग कार्यालयांत करण्यात आले असून ८ मेपर्यंत १५ दिवस हे प्रशिक्षण चालणार आहे. प्रत्येकी ४० ते ५० जणांच्या ७७ गटांद्वारे हे प्रशिक्षण दिले जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी नियुक्त ३७०० प्रगणक व पर्यवेक्षक १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलन करणार आहेत. प्रत्येक घरातील कुटुंबाची सामाजिक, आर्थिक व लोकसंख्याशास्त्रीय माहिती अचूकपणे नोंदविण्यावर भर दिला जाणार आहे. संकलित माहिती ‘सेन्सस मॅनेजमेंट ॲंड मॉनिटरिंग सिस्टिम’ (सीएमएमएस) या डिजिटल प्रणालीवर अपलोड करण्यात येणार आहे.

# १५व्या वित्त आयोगाच्या निधीचे पारदर्शक नियोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यासाठी पंचायत समितीला उपलब्ध झालेला १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा योग्य विनियोग केला जाणार आहे. त्यासाठी प्रत्येक पंचायत समिती सदस्याला कामे सुचवण्यास सांगण्यात आले आहे. विकास निधीचा वापर तालुक्यातील सर्व भागांसाठी करण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी सुयोग्य नियोजन सुरू असल्याची माहिती अलिबाग तालुका पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील यांनी दिली. या निधीच्या वाटपात आमदार महेंद्र दळवी यांचा कुठलाही हस्तक्षेप नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



## ■ आमदारांचा हस्तक्षेप नसल्याचे स्पष्टीकरण

अलिबाग तालुका पंचायत समितीच्या शुक्रवारी झालेल्या मासिक सभेतील निर्णयांची माहिती देण्यासाठी आणि यासंदर्भात सुरू असलेल्या चर्चेबाबत आपली भूमिका मांडण्यासाठी आज पत्रकार परीषद आयोजीत करण्यात आली होती. शुक्रवारी झालेल्या सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. मागील मार्च महिन्याच्या मासिक सभेत पंचायत समिती सेस फंडाच्या कामांना तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय सर्वानुमते झाला होता. परंतु इतिवृत्तात याचा उल्लेख नव्हता. याबाबत शुक्रवारी झालेल्या मासिक सभेत सदस्यांनी याबाबतचा जाब गटविकास अधिकारी यांनाविचारला मात्र त्यावर त्यांनी काहीच उत्तर दिले नाही.

यावर समाधानकारक उत्तर मिळावे असा आग्रह सदस्यांनी धरून त्यासाठी सभा काही काळ स्थगित करण्यात आली मात्र त्याचा काही लोक विपर्यास करून चुकीची माहिती पसरवत असल्याचा आरोप सभापती भाग्यता पाटील यांनी दिला. स्थगितीचा निर्णय सर्वसंमतीने झाला होता. त्यामुळे त्यावर कुणाचा आक्षेप असण्याचे कारणच नाही असेही भाग्यता पाटील यांनी स्पष्ट केले.

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा योग्य विनियोग करण्याच्या दृटीने नियोजन सुरू आहे. त्यासाठी सर्व सदस्यांकडून कामांचे प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. हा निधी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठीच वापरला जाईल यात कुठलाही दुजाभाव होणार नाही याची काळजी घेतली जात असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्णवेळ बीडीओ हवा अलिबाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी या दिव्यांग आहेत. असे असताना त्यांच्यावर तीन कामांचा प्रभार सोपवण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कामावर लक्ष केंद्रीत करता येत नाही. शिवाय दिव्यांग असल्यामुळे त्यांना कामात मर्यादा येत आहेत, ही बाब लक्षात घेवून अलिबाग तालुका पंचायत समितीसाठी पूर्णवेळ गटविकास अधिकारी द्यावा, अशी मागणीही सर्व सदस्यांनी लावून धरली आहे.

अलिबाग तालुक्याच्या काही भागात विशेषतः खारेपाट भागात पाणीटंचाई भेडसावते आहे. हे लक्षात घेवून या भागातील टंचाईग्रस्त गावांना टँकरव्दारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. तसेच टंचाईचा आढावा घेवून नळपाणी योजनांची दुरूस्ती, बोअरवेल दुरूस्तीची कामे हाती घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्याचे शिवसेनेचे गटनेते प्रकाश पाटील यांनी सांगितले.

### सदस्यांना सर्वाधिकार

***अलिबाग पंचायत समितीकडील १५ व्या वित्तआयोगाच्या निधीवाटपात आमदार महेंद्र दळवी यांचा हस्तक्षेप सुरू असल्याचा आरोप होत आहे. या आरोपांचे भाग्यता पाटील यांनी खंडन केले. आमदार महेंद्र दळवी हे मतदार संघात करोडो रूपयांची कामे मंजूर करून विकास करीत आहेत. त्यामुळे पंचायत समितीच्या निधी वाटपात त्यांना लुडबुड करण्याची गरज नाही. यासाठी त्यांनी आम्हाला सर्वाधिकार दिले असल्याचे भाग्यता पाटील यांनी स्पष्ट केले.***

# म्हसळ्यात शिक्षणाचा नवा अध्याय!

## स्मृतीभवन व अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळेचे लोकार्पण

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण क्षेत्रात एक ऐतिहासिक पाऊल टाकत शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतीभवन व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे विज्ञान प्रयोगशाळेचे भव्य लोकार्पण करण्यात आले.



या प्रसंगी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी विद्यार्थ्यांना मोठे स्वप्न पाहण्याचा संदेश दिला. "विद्यार्थ्यांनी MPSC आणि UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांत यश मिळवून म्हसळा तालुक्याचे नाव उज्वल करावे. यासाठी शिक्षकांनी सातत्याने मार्गदर्शन करावे," असे प्रेरणादायी उद्गार त्यांनी काढले.कार्यक्रमादरम्यान मंत्री तटकरे यांनी विज्ञान प्रयोगशाळेची पाहणी करून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला आणि त्यांच्या प्रकल्पांची माहिती जाणून घेतली.

शाळेच्या विकासासाठी कोट्यवधींचा निधी शाळेचे चेअरमन समीर बनकर आणि प्राचार्य धर्मराज पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे खासदार सुनिल तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांच्या निधीतून शाळेसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला.आसल्याचे प्राचार्य यानी सांगून त्यामध्ये इमारत बांधकाम व दुरुस्ती शैक्षणिक साहित्य,विद्यार्थ्यांना सायकल वाटप,संगणक सुविधा आधुनिक प्रयोगशाळाअशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. तसेच CRS फंडातून चालू वर्षात तालुक्यातील ५ शाळांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये न्यू इंग्लिश स्कूलचा समावेश झाल्याची घोषणा मंत्री तटकरे यांनी केली.

साळुंखे यांच्या कार्याची प्रेरणा शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी "ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार" या ध्येयाने ग्रामीण भागात शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी उभारलेले स्मृतीभवन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे. या कार्यक्रमासअभयकुमार साळुंखे, वैकुंठ पाटील, अनिकेत पानसरे, नाझिम हसवारे, मधुकर गायकर, संदीप चाचले, संजय कर्णिक, जयश्री कापरे, राखी करंबे आदी मान्यवर उपस्थित होते.या वेळी देणगीदार समीर बनकर, नामदेव महाडिक तसेच इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थी संदीप गावडे यांनी शाळेला ₹५१,००० देणगी दिल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आलाकार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरे सर यांनी केले, तर प्रास्ताविक मांजरेकर सर यांनी मांडले. प्राचार्य धर्मराज पाटील यांनी समाधान व्यक्त करत शाळेच्या प्रगतीचा आढावा दिला.

# मांडला येथे तीन दिवसीय जनगणना प्रशिक्षण

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील जनगणना प्रशिक्षण मांडला येथे दिनांक २३ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या संपन्न झाले. मुरुड तालुक्याचे तहसीलदार आदेश डफळ, नायब तहसीलदार राजश्री साळवी, प्रतीक पावसकर, साहिल साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून राजेंद्र नाईक व चेतन चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली होती. प्रशिक्षणात राजेंद्र नाईक यांनी प्रगणक आणि पर्यवेक्षकांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या, तसेच कायदेशीर तरतुदी आणि प्रगणक व पर्यवेक्षक यांचे अधिकार स्पष्ट केले, त्यानंतर चेतन चव्हाण यांनी घरयादी गट, परिसर, इमारत, गणनाघर, कुटुंब तसेच घरांना क्रमांक देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे इत्यादी बाबींची माहिती दिली.

एच एल ओ ऐप चा प्रभावी वापर, प्रत्येक बाबीसाठी योग्य संकेतांक निवडीबाबत माहिती देण्यात आली. एका प्रगणकास १८० ते २०० कुटुंबांची नोंद अथवा ८०० लोकसंख्या नोंद करणे आवश्यक आहे तसेच पर्यवेक्षकाने एकूण पाच ते सहा प्रगणकाचे काम पूर्ण करून घेणे बंधनकारक असेल अशी संपूर्ण माहिती मार्गदर्शक यांनी स्पष्ट केली. शेवटी पुष्पा राऊत, जगदीश चवरकर, शरद पाटील, गायकवाड इत्यादी शिक्षकांनी आपल्या मनोगतात प्रशिक्षण अतिशय सुंदर झाले व त्यामुळे जनगणना करणे अतिशय सोपे होईल, असे मत व्यक्त केले.

सदर प्रशिक्षण कालावधीत गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, शिक्षण विस्तार अधिकारी सुनील पाटील, केंद्रप्रमुख संदीप वारगे, जगदीश चवरकर शिक्षण सल्लागार समिती सदस्य, भास्कर साळावकर शिक्षक परिषद अध्यक्ष, प्रसाद माळी,काकडे मंडळ अधिकारी,मुख्याध्यापक रमाकांत ठाकूर, तसेच पत्रकार संजय करडे, तलाठी, ग्रामसेवक यांनी भेटी दिल्या. शरद पाटील यांनी सूत्रसंचालन केले उपस्थितांचे आभार मानले.



# चौलच्या इतिहासाची साक्षीदार प्राचीन आसा मशिद दुरवस्थेत



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलला ऐतिहासिक स्थान असून येथील पुरातन मंदिरे, वास्तू प्राचीन चौलच्या वैभवाचे साक्षीदार आहेत. चौल येथील राजकोट किल्ला मराठयांच्या हल्लात जमीनदोस्त झाला. मुसलमान अमदानीत चौल मध्ये प्रांताधिकारांचे मुख्यालय असावे असे हमामखाना, हजामखाना, कबरस्तान, कलावंतीचा वाडा आदी अनेक वास्तूने सिध्द होते. चौल मुघल अमदानीत भक्तीस्थान असावे असे येथील दगडी बांधकामाची आसा मशिद पाहिल्यावर दिसून येते.

चौलनाक्यावरून आग्राव,शितळादेवीकडे जाताना काटकर आळीकडे जाण्याचा मार्ग आहे. येथील हमामखान्याच्या काही अंतरावर कुंडलिका समुद्र खाडी किनारी लगत दगडी बांधकामाची आसा मशिदीचे अवशेष आहेत. चौल काटकर आळीतील नारळ सुपारीच्या बागायतीकडून या आसा मशिंदीकडे जाण्याचा मार्ग आहे.

दगडी बांधकामाची आसा मशिदीचे पुर्णतः दुरावस्थेतील अवशेष आढळतात. या आसा मशिदीचे बांधकाम पाहिले असताना मुघल अमदानीत येथे भक्तीचे मोठे स्थान असावे असे दिसून येते.

आसा मशिद पुर्णतः भग्नावस्थेत असून तिचे दगडी बांधकामाचे अवशेष अदयापी भक्कम स्थितीत आहे. आसा मशिदीचे उभ्या दगडी खांबावर कोरीव व रेखीव नक्षीकाम पहाण्यासारखे आहे. आसा मशिदी पुर्णतः मोडकलीस व दुरावस्थेत असून सुध्दा तिचे आठ ते दहा दगडी बांधकामाचे अवजड खांब प्राचीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. आसा मशिदीच्या वरील बाजूस दगडी बांधकामाचा घुमट अदयापी मजबूत दिसून येतो. ही आसा मशिद दोन मजली इमारतीची असावी असे तिचे दगडी बांधकाम पहाताना दिसते. आसा मशिदीच्या पाया सुध्दा दगडी बांधकामाचा असून अदयापी कणखर आहे. वरील बाजूकडील पडझड व दुरावस्थेने आसा मशिद मोडकलीस आली आहे. मात्र आसा मशिदीचे बांधकाम प्राचीन बांधकामाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून पहाण्यासारखा आहे.

पुरातत्व खात्याचे या प्राचीन आसा मशिदीकडे दुर्लक्ष केले असल्याचे निश्चित जाणवते. या आसा मशिदीकडे जाण्याचा मार्गफलक तसेच येथे आसा मशिदी सभोवतालची झाडे झूडपे यांची सफाई केली तर पर्यटक तसेच इतिहास प्रेमीना आसा मशिद पहाताना निश्चित प्राचीन इतिहासाच्या उत्कृष्ट बांधकाम पहाण्याचे भाग्य लाभेल.

# पालीमध्ये येणाऱ्या गणेशभक्तांना एकाच ठिकाणी तीन देवदर्शनांचा लाभ

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अष्टविनायकांच्या पवित्र सान्निध्यात न्हालेल्या पाली नगरीत श्रद्धा, परंपरा आणि भक्तिभावाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. मधली आळी, कसबे पाली येथील अतिप्राचीन श्री केदारेश्वर मंदिर व श्री मारुती मंदिराच्या जीर्णोद्धार व पुनर्विकास प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पडला. सुमारे दोन कोटी रुपयांच्या अपेक्षित खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे परिसराचा कायापालट होणार आहे. देवस्थानचे अध्यक्ष अभिजीत चांदोरकर यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी विश्वस्त, भाविक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पालीतील श्री बल्लाळेश्वर मंदिर हे अष्टविनायकांपैकी एक पवित्र स्थान असल्याने येथे दररोज हजारो भाविक येतात. विशेष म्हणजे, श्री बल्लाळेश्वर मंदिराकडे जाताना मार्गातच लागणारे आणि अगदी जवळ असलेले श्री केदारेश्वर व श्री मारुती मंदिर भाविकांना सहजपणे दर्शनासाठी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे "एकाच दर्शनात तीन देवस्थानांचा लाभ" अशी भाविकांची आध्यात्मिक अनुभूती अधिक समृद्ध होणार आहे. या पार्श्वभूमीवर जवळच असलेल्या केदारेश्वर व मारुती मंदिराचा विकास केल्यास धार्मिक पर्यटनाला अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सुमारे ३४० वर्षांची परंपरा लाभलेले श्री मारुती मंदिर हे पालीकरांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. समर्थ रामदासांच्या सेवेकऱ्यांनी स्थापलेली ही मूर्ती आजही भक्तांच्या मनात अढळ विश्वास निर्माण करते. सहा फूट उंचीची तेजस्वी मूर्ती आणि त्याहूनही प्राचीन श्री केदारेश्वर मंदिर या दोन्ही देवस्थानांमुळे परिसरात दिव्य ऊर्जा जाणवते.या पुनर्विकास आराखड्यात केवळ मंदिरांचे जीर्णोद्धार नाही, तर भक्तांना शांतता, समाधान आणि अध्यात्मिक अनुभव देणारा संपूर्ण परिसर उभारण्याचा संकल्प आहे. टप्प्याटप्प्याने शंकर मंदिराचा जीर्णोद्धार, बहुउद्देशीय सभागृह, सुशोभित परिसर, पवित्र कुंड, दशक्रिया विधीसाठी मंडप आणि अखेरीस श्री मारुती मंदिराचा जीर्णोद्धार अशा योजनांमुळे हा परिसर भाविकांसाठी अधिक समृद्ध आणि आकर्षक ठरणार आहे.हा प्रकल्प म्हणजे केवळ बांधकाम नव्हे, तर श्रद्धेचा पुनर्जन्म असल्याची भावना भाविकांमध्ये व्यक्त होत आहे.

पालीच्या मध्यभागी व एकाच आवारात दोन प्राचीन देवस्थानांचा हा संगम भविष्यात श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचे केंद्र बनेल, असा विश्वास व्यक्त होत आहे मंदिरांचे पावित्र्य जपत विकास साधला जाणार आहे.या पवित्र उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. "ही केवळ देणगी नसून, पुढील पिढ्यांसाठी श्रद्धेचा वारसा जपण्याची संधी आहे," अशी भावनिक साद देण्यात आली आहे .

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाचा मुरूड तालुक्यात शुभारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

माझं गाव आरोग्य संपन्न गाव हे अभियान राज्यभरात राबविण्यात सुरू झाले आहे त्या अनुषंगाने मुरुड तालुक्यात तालुकास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन मुरूड पंचायत समितीचे सभापती – निलेश घाटवळ यांनी केले.

यावेळी मुरुड पंचायत समिती उपसभापती अश्विनी जंगम, सदस्य गणेश नाक्ती, गटविकास अधिकारी राजेंद्र कुमार खताळ ,तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर –अक्षय कुमार सोळंकी व एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी– संजय शेंडगे, प्रवीण पाटील, राजेंद्र चुनेकर,आरोग्य सहाय्यक–गणेश शिंदे ,शालीकराव पावरा वैद्यकीय अधिकारी आरोग्य कर्मचारी आदिंसह मान्यवर उपस्थितीत होते. या अभियानाचा उद्देश गावातील प्रत्येक नागरिकांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी राज्यभरात माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान राबविण्यात येणार आहे सर्व वयातील सर्व लोकांना आरोग्यदायी व कल्याणकारी जीवन मिळण्याची खात्री असण्यावर भर देणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे समाजाचे विविध घटक किशोरवयीन मुले व मुली महिला लहान मुले वंचित घटकासह सर्व घटकांना सहभागी व सशक्त करण्यासाठी एक सर्व समावेशक दृष्टिकोन आवश्यक आहे जेणेकरून आरोग्य लोकांच्या दैनंदिन चर्चा व कृतीमध्ये केंद्रस्थानी येऊ शकेल प्रजा निरोगी तर राज्य सशक्त या तत्त्वज्ञानावर आधारित गावांमधील नागरिकांना सुदृढ आणि सशक्त बनवण्यासाठी माझं गाव आरोग्य संपन्न गाव हे अभियान राज्यात सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.असे पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ यांनी पंचायत समिती कार्यालयातील महाराष्ट्र भुषण आ.डॉ.ति.श्री नाना साहेब धर्माधिकारी सभागृहात मत व्यक्त केले.

गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांनी आरोग्य विषयक व अभियानामध्ये काम करण्याबाबतचे मार्गदर्शन केले. तालुका आरोग्य अधिकारी यांनी हे अभियान राबविताना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रामध्ये काय कृती करावी याबाबतचे सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी केले.



# हैदराबादकडून राजस्थानचा पराभव

## अभिषेक-किशनची दमदार खेळी



**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मध्ये शनिवारी जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात दिवसाचा दुसरा सामना खेळला गेला. या सामन्यात पाहुण्या हैदराबाद संघानं राजस्थानचा ५ गडी राखून पराभव केला. या हंगामात राजस्थानवर हैदराबादचा हा सलग दुसरा विजय आहे.

यापूर्वी, जेव्हा दोन्ही संघ हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भेटले होते, तेव्हा एसआरएचनं आरआरचा ५७ धावांनी पराभव केला होता. या सामन्यात राजस्थाननं प्रथम फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीच्या शतकाच्या बळावर २० षटकांत ६ बाद २२८ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात अभिषेक शर्मा आणि किशानच्या अर्धशतकांच्या बळावर हैदराबादनं १९ व्या षटकात ५ गडी गमावून २२९ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. विशेष म्हणजे आयपीलच्या इतिहासातील चौथ्या क्रमांकाच्या सर्वाधिक यशस्वी धावांचा आहे. या विजयामुळं सनरायझर्स हैदराबादचे १० गुण झाले असून ते गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आले आहेत. राजस्थान चौथ्या स्थानावर घसरला आहे. या हंगामात आरआरचा हा तिसरा पराभव होता.

तत्पूर्वी, सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना, राजस्थान रॉयल्सने ६ गडी गमावून २२८ धावा केल्या. वैभव सूर्यवंशीने राजस्थानसाठी १०३ धावा करत शानदार शतक झळकावले. ध्रुव जुरेलनेही शानदार अर्धशतक झळकावले. हैदराबादकडून प्रफुल्ल हिंगे आणि इशान मलिंगा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### सलग चौथा विजय

राजस्थान रॉयल्सच्या मोठ्या धावसंख्येला प्रत्युत्तर देताना, सनरायझर्स हैदराबादने शानदार फलंदाजी करत १९ व्या षटकात ५ गडी गमावून २२९ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. सनरायझर्स हैदराबादकडून इशान किशनं ३१ चेंडूंमध्ये ७४ धावांची वेगवान खेळी केली. अभिषेक शर्माने २९ चेंडूंमध्ये ५७ धावांची वादळी खेळी केली. आयपीएल २०२६ मधील एसआरएचचा हा ५ वा विजय आहे. अशाप्रकारे, हैदराबाद संघ आता १० गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. राजस्थान रॉयल्स तिसऱ्या स्थानावरून चौथ्या स्थानावर घसरला आहे. हैदराबाद आणि राजस्थान या दोघांचेही १० गुण समान आहेत, परंतु एसआरएचचा नेट रन रेट चांगला आहे.

# दिल्लीविरुद्ध विक्रमी २६५ धावा करत पंजाबचा विजय

## केएल राहुलची १५२ धावांची खेळी व्यर्थ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ चा ३५वा सामना २५ एप्रिल रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात पंजाब किंग्सनं आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठं लक्ष्य गाठून इतिहास रचला. दिल्ली कॅपिटल्सनं पंजाब किंग्ससमोर २६५ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं, जे त्यांनी १८.५ षटकांत सहा गडी राखून पूर्ण केलं.

सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाची सुरुवात खराब झाली, सलामीवीर पथुम निस्सांका अवघ्या ११ धावांवर अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीवर बाद झाला. मात्र, यानंतर पंजाब किंग्सला विकेट्सची नितांत गरज भासू लागली, कारण केएल राहुल आणि नितीश राणा यांनी मैदानावर धुमाकूळ घातला. राहुलनं ११२ चेंडूंमध्ये १६ चौकार आणि ९ षटकारांसह नाबाद १५२ धावा केल्या, त्याचा स्ट्राईक रेट २२६.८६ होता. नितीश राणानंही ४४ चेंडूंमध्ये ११ चौकार आणि ४ षटकारांसह शानदार ९१ धावा केल्या, त्याचा स्ट्राईक रेट २०६.८१ होता. मात्र, नितीश शतक पूर्ण करण्याच्या जवळ पोहोचला असतानाच, झेवियर बार्टलेटनं त्याला श्रेयस अय्यरकरवी झेलबाद केले. यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या डेव्हिड मिलरनं ३ धावांचं योगदान दिलं, ज्यामुळं संघाची धावसंख्या २० षटकांत २ गडी बाद २६४ झाली.

दिल्लीनं दिलेल्या महाकाय लक्ष्याचा पाठलाग करताना, पंजाब किंग्सची सलामीची जोडी प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी धडाकेबाज सुरुवात केली आणि अवघ्या ४१ चेंडूंमध्ये पहिल्या विकेटसाठी १२६ धावा जोडल्या. प्रियांश आर्यनं ४३ धावा केल्या. त्यानंतर प्रभसिमरन सिंगनं २६ चेंडूंमध्ये शानदार ७६ धावा करुन तोच वेग कायम ठेवला. सामन्यात एका टप्प्यावर पंजाब किंग्सनं २०१ धावांत चार गडी गमावले होते. कर्णधार श्रेयस अय्यरनं शशांक सिंगसोबत पाचव्या विकेटसाठी ६४ धावांची भागीदारी रचली आणि सात चेंडू शिल्लक असताना विजय मिळवून दिला.

# वैभव सूर्यवंशीचा वर्ल्ड रेकॉर्ड : ४७३ चेंडूंमध्ये ठोकल्या १००० धावा



**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीनं आयपीएल २०२६ च्या ३६व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध शानदार शतक झळकावलं. त्यानं ३७ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि १२ षटकारांसह १०३ धावा केल्या. या शतकासह त्यानं टी-२० क्रिकेटमध्ये एक विश्वविक्रमही प्रस्थापित केला. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल ओवेनचा विक्रम मोडून तो टी-२० फॉरमॅटमध्ये सर्वात जलद १००० धावा करणारा फलंदाज ठरला.

वैभव सूर्यवंशी चेंडूंच्या संख्येनुसार टी-२० फॉरमॅटमध्ये सर्वात जलद १००० धावा करणारा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम मिचेल ओवेनच्या नावावर होता. त्यानं ५३३ चेंडूंमध्ये १००० धावा पूर्ण करून टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद १००० धावा करण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला होता. आता, अवघ्या ४७३ चेंडूंमध्ये १००० धावा करून वैभव सूर्यवंशीनं हा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. वैभवनं आतापर्यंत टी-२० क्रिकेटमध्ये २०० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटनं धावा केल्या आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू अँड्र्यू सायमंड्स आहे, ज्यानं ५५८ चेंडूंमध्ये १००० टी-२० धावा पूर्ण केल्या होत्या.

वैभव सूर्यवंशीच्या टी-२० फॉरमॅटमधील कामगिरीबद्दल बोलायचं झाल्यास, त्यानं आतापर्यंत २६ सामने खेळले आहेत. या २६ डावांमध्ये त्यानं ४२.३२ च्या सरासरीनं १०५८ धावा केल्या आहेत. या सर्व धावा २१३.७३ च्या स्ट्राइक रेटनं आल्या आहेत. या काळात त्यानं ४ शतके आणि ३ अर्धशतकं झळकावली आहेत. आयपीएलमध्ये वैभवनं आतापर्यंत १५ सामने खेळले असून, १५ डावांमध्ये ४०.६० च्या सरासरीनं ६०९ धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याचा स्ट्राइक रेट २२२.२६ राहिला आहे.

# प्रभसिमरने मारले ६ चेंडूत ६ चौकार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या इतिहासात तिसऱ्यांदा असं घडलं आहे की, एका फलंदाजानं एका षटकातील सर्व सहा चेंडूंवर सहा चौकार मारले आहेत. पृथ्वी शॉ आणि अजिंक्य रहाणे यांच्यानंतर हा पराक्रम करणारा प्रभसिमरन सिंग तिसरा फलंदाज ठरला आहे. आयपीएल २०२६ च्या ३५व्या सामन्यात, प्रभसिमरननं दिल्ली कॅपिटल्सचा गोलंदाज मुकेश कुमारच्या एका षटकातील सलग सहा चेंडूंवर सहा चौकार मारले.

प्रभसिमरन सिंगनं दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २६ चेंडूंमध्ये ७६ धावांची शानदार खेळी केली. या खेळीत त्यानं नऊ चौकार आणि पाच षटकारही मारले. आयपीएलमध्ये पाच वर्षांनंतर हा पराक्रम पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे. अजिंक्य रहाणेनं २०१२ मध्ये आणि पृथ्वी शॉनं २०२१ मध्ये ही कामगिरी केली.

प्रभसिमरन सिंगनं २६ चेंडूंमध्ये ७६ धावा करुन दिल्लीच्या गोलंदाजीची अक्षरशः धुलाई केली.

# बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा ऐतिहासिक निर्णय!

### खेळाच्या अनेक नियमांमध्ये बदल



**मुंबई : प्रतिनिधी**

बॅडमिंटनचे सामने आता २१x३ पद्धतीऐवजी १५x३ गुणपद्धतीनुसार खेळले जातील. सामने आता तीन २१x२१ गेम्सऐवजी तीन १५x१५ गेम्समध्ये खेळले जाणार आहेत. डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे झालेल्या बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या नवीन गुणपद्धतीला प्रचंड बहुमताने मंजुरी देण्यात आली. सभेत सादर केलेला प्रस्ताव १९८-४३ मतांनी मंजूर झाला. ही नवीन पद्धत ४ जानेवारी २०२७ पासून लागू होणार आहे.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा युक्तिवाद आहे की, या नवीन पद्धतीमुळे खेळात लवकरच उच्च-दबावाच्या हालचाली निर्माण होतील आणि खेळातील रोमांच वाढेल. बॅडमिंटनमध्ये सध्याचा २१-पॉइंट प्रकार २००६ मध्ये सुरू करण्यात आला होता. या प्रकारानुसार, सामने सातत्याने ४५ ते १०० मिनिटांपर्यंत लांबत होते, ज्यामुळे प्रसारक नाराज झाले होते. त्यांनी मागणी केली की सर्व पाच विभागांतील (पुरुष आणि महिला एकेरी, दुहेरी आणि मिश्र) सामने तीन तासांच्या आत पूर्ण केले जावेत. बीडब्ल्यूएफच्या अध्यक्षा खुनयिंग पटमा लीसावडट्रकुल म्हणाल्या की, हा निर्णय बॅडमिंटनच्या भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

"आम्ही पुढच्या पिढीसाठी एक खेळ तयार करत आहोत आणि आम्ही आमच्या खेळाडूंच्या दीर्घकालीन भविष्यात गुंतवणूक करत राहू. ३x१५ गुणपद्धतीचा उद्देश बॅडमिंटनला अधिक रोमांचक आणि स्पर्धात्मक बनवणे, वेळापत्रकात सुधारणा करणे, सामन्याच्या वेळेत अधिक एकसमानता आणणे आणि खेळाडूंचे आरोग्य व पुनर्वसनासाठी संभाव्य फायदे प्रदान करणे हा आहे," असे लीसावडट्रकुल यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

जागतिक संस्थेने सांगितले की, सदस्य आणि हितधारकांशी चाचणी, विश्लेषण आणि सल्लामसलत करण्याच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर हा निर्णय घेण्यात आला. हे खेळाडूंच्या आरोग्याप्रती असलेल्या वचनबद्धतेतून आणि खेळाडूंना अधिक दीर्घ व यशस्वी कारकीर्द घडवण्यासाठी मदत करण्याच्या हेतूने प्रेरित, बीडब्ल्यूएफ सदस्यांचे सामूहिक मत दर्शवते.

# कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे आणि रायगड तायक्वॉन्डो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास ४७० विद्यार्थिनींनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. याचे उद्घाटन प्राचार्य अविनाश कुळकर्णी यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी शमिका कुळकर्णी, शुभांगी ठाकूर, सुवर्णा मॅडम पल्लवी बुगाले व अक्षता चितळे आदी उपस्थित होते. प्राचार्य अविनाश कुळकर्णी आपल्या भाषणात म्हणाले की, सुभाष पाटील हे आपल्या विद्यार्थिनींना मोफत प्रशिक्षण देतात. त्यांचे खूप मोठे योगदान आहे आपल्या शाळेतील विद्यार्थिनींना तायक्वॉन्डो या खेळामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवून दिलेली आहेत.

शाळेच्या विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिक शक्तीला चालना देण्यासाठी तसेच कॉलेज आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा उद्देशाने त्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले.

यासाठी आंतरराष्ट्रीय पंच सातवी डिग्री व मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांचे सहकारी अनिल म्हात्रे, जय पाटील, शीफा शेख, श्रेया लालु द्रुवल सालियान समर्थ बराटे, रियान शेख इत्यादींचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे या सेमिनारसाठी महाविद्यालयच्या सर्व शिक्षिका उपस्थित होत्या आणि त्यांनीही प्रशिक्षण घेतले, असे सुभाष पाटील यांनी सांगितले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com